# दिनकर पुरोहितचा खून

## ( तीन अंकी नाटक )

चं. प्र. देशपांडे



# दिनकर पुरोहितचा खून

**(तीन अंकी नाटक)**

**--- चं.प्र.देशपांडे.**

**अंक पहिला**

( वेळ, काळ, पात्रांची वयं, पोषाख, व्यवसाय इत्यादी सर्व ओघातून समजून घेणे. स्टेज- बिझिनेस काहीही निरर्थक.)

रमाबाई: : सुट्टी असली की कसं बरं वाटतं नाही --

देवरस : हं --

रमाबाई : पण मग अगदी संध्याकाळी असं जरा करमेनासं होतं --

देवरस : हं --

रमाबाई : बायका म्हणतात, देवरसांना असं सारखं घरात बसून कंटाळा कसा येत नाही --

देवरस : मग काय करावं म्हणतात ? मधनं मधनं त्यांच्याकडे जात जाऊ काय ?

रमाबाई : नुसते चावट विनोद करता तुम्ही !

देवरस : हं --

रमाबाई : बत्तीस वर्षं झाली आपलं लग्न होऊन --

देवरस : मला चावटपणा शोभत नाही !

रमाबाई : ते नव्हे हो, अलिकडं सांगावं सांगावं म्हणतेय मी, पण राहूनच जातं.

देवरस : बोल.,

रमाबाई : माझं प्रेम आहे तुमच्यावर !

देवरस : ( जरा वेळ पाहून --) माझंही आहे तुझ्यावर.

रमाबाई : आता कसं बरं वाटतंय ! हे तुम्हाला सांगितल्यावर मला खूप बरं वाटेल असं वाटलं होतंच मला.

देवरस : मलाही बरं वाटतंय.

रमाबाई : प्रेम असलं म्हणजे किती बरं च् वाटतं !

देवरस : होय ना -- खूप बरं वाटतं.

रमाबाई : अरे हो, मुख्य ते राहूनच गेलं. एक विचारायचं होतं तुम्हाला --

देवरस : बोल.

रमाबाई : आपण छत्र्यांचा कारखाना काढायचा का ?

देवरस : छत्र्यांचा ?

रमाबाई : होय हो -- छत्र्या नसतात का -- पावसात वापरतात त्या ?

देवरस : हं हं ! छत्र्यांचा ! पण कशासाठी ?

रमाबाई : काही नाही. काढायचा. मलाही जरा उद्योग होईल -- शिवाय आपल्याला लागतात त्या छत्र्या फुकटात पडतील !

देवरस : काय आहे, छत्र्यांचा विषय जरा आपल्या डोक्यावरूनच जातो. हे काय डोक्यात घेतलंस तू मधेच ?

रमाबाई : अहो, छत्र्यांचा धंदा फार फायद्यात पडतो. ‘ छत्र्यांचे उत्पादन ’ हे पुस्तक वाचलं मी नुक्तंच.

देवरस : कमालाय. तू काय काय वाचत असतेस, काय काय ठरवत असतेस त्याचा पत्ताच नसतो मला -- इतकं प्रेम असून !

रमाबाई : प्रेम आहेच हो -- काढायचा कारखाना ?

देवरस : छत्र्यांचा कारखाना ?

रमाबाई : इतकं सोप्पं करून सांगितलंय त्या पुस्तकात -- काही विचारू नका --

देवरस : आता तुलासुध्दा कळलं म्हणजे सोपं असणारच ते --

रमाबाई : या एकाच विनोदावर मराठी नाटकं बघणारे लोक गेली शंभर वर्षं हसताहेत -- एखादा नवीन विनोद करा की --

देवरस : छत्र्यांचा कारखाना काढू या !

रमाबाई : खरंच काढू या ?

देवरस : नाही, ते विनोदानं बोललो होतो मी -- नवीन विनोद केला की, असं सांगावं लागतं नंतर --

रमाबाई : आता विनोद वाटतोय तुम्हाला, पण स्वत:च्या कारखान्यात तयार झालेल्या छत्रीच्या सावलीतून ऐटीत चालाल तेव्हा किती समाधान वाटेल !

देवरस : स्वत:च्या कारखान्यात तयार झालेल्या मोटारीच्या सावलीतून जाताना याहून जास्त समाधान वाटेल.

रमाबाई : तुमचे नेहमी चैनी विचार असतात. त्यामुळं मग काहीच पदरात पडत नाही --

देवरस : निदान छत्री तरी पडू दे !

रमाबाई : म्हणजे तुम्हाला नेहमीप्रमाणे नकारघंटाच वाजवायचीय.

देवरस : नाही. तसंच काही म्हणता येणार नाही ..... कोण बरं लेखक त्या पुस्तकाचा.... हं...अभिनव गुप्ते काय ?

रमाबाई : इश्श ! म्हणजे तुम्ही वाचलंय ते पुस्तक ! बोलला नाहीत ते ? छत्र्यांचा धंदा कसा फायदेशीर आहे ते किती छान सांगितलंय त्या पुस्तकात !

देवरस : नाही. मी ते पुस्तक वाचलेलं नाही. त्या पुस्तकावरचं प्राध्यापक अमुक तमुक यांचं परीक्षण वाचलं होतं कुठल्यातरी वर्तमानपत्रात.

रमाबाई : मग काय प्रश्नच मिटला !

देवरस : नाही, त्याचं असं मत आहे की, या पुस्तकातलं सगळं बरोबर आहे पण छत्र्यांचं उत्पादन लहान -- की मोठ्या-- ते नक्की आठवत नाही -- पण लहान किंवा मोठ्या प्रमाणावर केलं, तरच ते फायदेशीर ठरतं -- नाहीतर आपल्या देशातल्या परिस्थितीत तरी ते खरं ठरणार नाही...

रमाबाई : एवढंच ना -- मग लहान प्रमाणावर काढू आपण --

देवरस : नाही. बहुतेक मोठ्या प्रमाणावर म्हटलंय त्या परीक्षणात.

रमाबाई : मग मोठ्या प्रमाणावर काढू.

देवरस : नाही. ते निश्चित आठवत नाहीय मला. ते परीक्षण शोधून काढीन मी -- नंतर बघू.

रमाबाई : चालेल. तुमची इंजिनिअरकी वगैरे चालू द्या. हे सगळं मी बघणार. प्रोपायटर सौ. रमाबाई देवरस.

देवरस : छत्रीचं नाव मात्र ' देवरस छत्री ' असं देऊ नकोस. कसला का असे ना, छत्रीतून रस गळणं पसंत पडायचं नाही लोकांना.

रमाबाई : तुमचा स्वभावच बाई विनोदी ! मग, काढायचा ना कारखाना ?

देवरस : ते परीक्षण सापडल्याशिवाय मला काही सांगता येणार नाही.

रमाबाई : पण मूळ पुस्तकापेक्षा त्या परीक्षणावरच का तुम्ही एवढे अवलंबून ?

देवरस : अगं पण आपल्या देशातली परिस्थिती विचारात घ्यायला नको का ? अमेरिकेत उपयोगी पडतील त्या छत्र्यांचा इथं काय उपयोग ?

रमाबाई : छत्री ती छत्री ! कुठल्या का देशातली असेना ! उघडली की आनंद देणारच ती !

देवरस : तुझं हे वाक्य एखाद्या तमाशातसुध्दा वापरता येईल. ( रमाबाईंचं वाक्य पुन्हा उच्चारतात.)

रमाबाई : एक मुलगा दवाखाना म्हणून नागपूरला -- दुसरा हॉस्टेलात -- पुण्याला. आपण हे इथं ! त्यामुळं पुन्हा पहिल्यासारखा चावटपणा यायला लागलाय तुमच्यात -- बरं, कुठं वाचलं होतं तुम्ही ते परीक्षण ? मी काढते ते शोधून -- रद्दी काही दिलेली नाही मी अजून --

देवरस : नाही, आपल्या घरच्या वर्तमानपत्रात नव्हतं वाचलं मी ते -- बहुतेक लायब्ररीत वाचलं होतं -- ते वर्तमानपत्र होतं की मासिक होतं, तेही नीट आठवत नाहीय --

रमाबाई : मग ते वाचलं होतं, एवढंच कशाला लक्षात ठेवलंय तुम्ही ? तेही अर्धवट ? प्रमाण लहान असावं का मोठं, हेही आठवत नाही तुम्हाला !

देवरस : झालंय खरं असं ! आता तू हे पुस्तक वाचणार आहेस हे माहीत असतं, तर नीट लक्षात ठेवलं असतं मी --

रमाबाई : मग आता या खेपेला आधीच सांगून ठेवते मी. सध्या मी 'सत्तेचे राजकारण ' हे पुस्तक वाचतेय. कुठं परीक्षण वगैरे आलं या पुस्तकाचं, तर लक्ष ठेवा आणि कात्रण घेऊनच या ते.

देवरस : म्हणजे आता राजकारणातही पडणार का काय तू ?

रमाबाई : तसंच काही नाही -- पण काय कुठला विषय निघेल आणि तुम्ही न आठवणाऱ्या परीक्षणाचा आधार घेत बसाल ते सांगता येत नाही. आता हा छत्र्यांचा कारखाना पडला की नाही लोंबकळत ?

देवरस : सत्तेच्या राजकारणाची काळजीच करू नकोस तू. त्याबद्दल माझी अशी खास चिंतनातून तयार झालेली मतं आहेत. आणि मुळात ते पुस्तक तुला आवडणारच नाही, ही खात्री आहे माझी.

रमाबाई : चुकलात. ते पुस्तक माझं नुकतंच वाचून संपलेलं आहे आणि मला ते अत्यंत आवडलेलं आहे.

देवरस : असं ?

रमाबाई : सत्तेचं राजकारण कसं संपुष्टात आणता येईल, ते अगदी सोप्या पध्दतीनं सांगितलंय त्या पुस्तकात.

देवरस : म्हणजे सत्तेचं राजकारण संपुष्टात आणता येईल असं म्हणणं आहे त्याचं ! ?

रमाबाई : संपुष्टात आणता येईल ! ? -- अहो, नुसतं एवढंच नव्हे तरं, सत्ता आणि राजकारण यांचा संबंधच कायमचा तोडून टाकता येईल अशी श्रध्दा आहे लेखकाची.

देवरस : कोण हा लेखक ?

रमाबाई : मुनीश्वर -- दीनानाथ मुनीश्वर म्हणून आहे कुणीतरी -- प्रचंड विचारशक्तीचा माणूस आहे --

देवरस : मलाही अलिकडं वाटायला लागलंय --

रमाबाई - काय ते ?

देवरस : आपणही एखादं पुस्तक ल्याह्यला काय हरकत आहे ? मूलभूत विचारांची वगैरे तशी वाण नाही माझ्याकडे, काय जरा इकडची तिकडची माहिती लागेल तेवढी जमवायची -- आहे काय त्यात -- आपले मूलभूत विचार तरी पुस्तकाशिवाय नुसतेच आपल्या डोक्यातच कशाला गंजू द्यायचे ! ?

रमाबाई : लिहा की मग. पण कुठल्या विषयावर एवढा मूलभूत विचार केलाय तुम्ही ? कुठला विषय घेणार पुस्तकाला ?

देवरस : ‘ मूलभूत विचार ! ’ ‘ मूलभूत विचार ’ म्हणजे काय -- हाच विषय घेणार. कारण याच विषयावर माझा जरा जास्त मूलभूत विचार झालेला आहे. म्हणजे हे एक पुस्तक वाचलं की, मग कुठल्याही विषयावर आपला आपल्याला मूलभूत विचार करता येईल. काय, कसं वाटतं ?

रमाबाई : पण त्याही पुस्तकावर परीक्षण आलं म्हणजे ?

देवरस : त्या पुस्तकावर त्या पुस्तकाहून मूलभूत परीक्षण कसं येईल ? शक्यच नाही.

रमाबाई : अहो, पण तुमचं पुस्तक वाचून झाल्यानंतरच परीक्षण लिहिणार ना तो ! म्हणजे मूलभूत ल्याह्यला जमणारच त्याला !

देवरस : मी काय करणार, पुस्तक खरंच जरा मूलभूतच लिहिणार -- म्हणजे पहिली काही, दोन वर्षं तरी निदान, त्यातलं कुणाला काही कळणारच नाही -- पुढचं पुढं बघू -- फार फार तर काय होईल -- दहाएक वर्षांनी लोक म्हणतील, की बुवा, त्या काळात ते मूलभूत वाटलं, पण आता ते तितकंसं मूलभूत राहिलेलं नाही -- हरकत नाही. अं -- काय --

रमाबाई : पुस्तक तर लिहा आधी -- पुढचं पुढं बघू

देवरस : ’ माझी पत्नी सौ. रमाबाई देवरस -- हीस --’ असं लिहिणार पहिल्या पानावर ! हे झालं एक पान . पुढं दोनतीन पानं असंच काही किरकोळ किरकोळ ठेवायचं ! त्यापुढचं मात्र लिहावं लागणार !

रमाबाई : साधारण किती पानांचं होईल हे पुस्तक ?

देवरस : जरा मोठंच होईल असं वाटतंय. प्रकरण पहिले --‘ विचारांची गंगोत्री ’-- हे म्हणजे प्रास्ताविक. नंतर ’ विचार म्हणजे काय ’ -- त्यानंतर ‘ विचारांची उपयुक्तता ’ -- त्यानंतर ’ विचारशक्तीचे उगमस्थान,’ मग ’ विचार प्रभावी कसे ठरतात ’ -- मग ‘ विचार आणि प्रचार ’ -- यात मधेच ‘ विचार आणि अविचार ’ हेही एक प्रकरण ठेवायचं--‘ आणि मग शेवटची दोनतीन प्रकरणं अशी -- ‘ विचाराने मानवाला काय दिले,’ ‘ खोडून काढलेल्या विचारांचे पुनरुज्जीवन कसे करावे ? ’, ‘ प्रभावी विचारांचा प्रभाव कमी कसा करावा ’ आणि मग ‘ उपोद्घात ’ -- नुसता -’ उपोद्घात ’ च पन्नास ते साठ पानांचा होईल.!

रमाबाई : आधी उपोद्घातच लिहा तुम्ही -- आणि उपसंहार कधी असतो ?-- नुसती प्रकरणांची नावं ऐकूनच हे किती महत्त्वाचं पुस्तक होईल ते कळतंय --

वरस : एकूण सुमारे अडीचशे ते तीनशे पानांचं पुस्तक होईल. पुस्तकाचं नाव ‘ आदर्श विचार ’ असं ठेवायचं. किंमत रूपये सातशे सत्तावन्न. लेखक श्री. उमाकांत देवरस -- म्हणजे मी -- मी स्वत: !

रमाबाई : या सगळ्या गडबडीत माझ्या छत्र्यांच्या कारखान्याचं तेवढं मागं पडणार --

देवरस : एवढं जर तू सहकार्य दिलंस ना, तर प्रस्तावनेत लिहिणार मी, की बुवा, माझ्या पत्नीच्या सहकार्याशिवाय हे पुस्तक लिहून प्रसिध्द करणं शक्य झालं नसतं.

रमाबाई : खरंच लिहिणार आहात का तुम्ही हे पुस्तक ? नाहीतर कारखानाही नाही आणि पुस्तकही नाही -- असं नको.

देवरस : हे असं नाउमेद करणारं बोलू नकोस बघ तू. तुझं मुख्य प्रोत्साहन पाहिजे.

रमाबाई : आमच्या छत्र्यांना मात्र तुम्ही मागं ओढत रहा --

देवरस : आता छत्र्या महत्त्वाच्या की विचार महत्त्वाचे ?

रमाबाई : पावसाळ्यात विचारांचा काय उपयोग होणार ? छत्रीच पाहिजे.

देवरस : तू नुसता पावसाळ्याचा विचार करतेयस आणि मी संपूर्ण मानवी जीवनाचाच विचार करतोय – आपल्या जीवनासकट.

रमाबाई : तुम्हाला ते मूलभूत विचारांचं तंत्र माहीत असल्यामुळं, तुम्ही नेहमी हरवता मला. तुमचं पुस्तक लिहून झालं की, पहिल्यांदा मीच वाचून काढते ते -- मग बघते तुमच्याकडे.

देवरस : ते जमणार नाही. ' विचार प्रभावी कसे ठरतात ' -- या प्रकरणात नवरा-बायको या नात्यात नवरा असणं कसं महत्त्वाचं आहे -- सत्ताधारी असणं कसं महत्त्वाचं आहे -- आणि सरळ विचार मांडण्यापेक्षा कुत्सितपणाच्या अंगानं जाणं कसं जास्त उपयोगी आहे -- ते लिहिणार आहे मी. थोडक्यात म्हणजे, मूलभूत विचारापेक्षा दुसऱ्याच गोष्टी कशा अधिक महत्त्वाच्या आहेत, ते दाखवणार आहे मी. उपोद्घातात तर, मूलभूत विचार असा काही नसतोच -- हे दाखवणार आहे मी.

रमाबाई : म्हणजे, तसं म्हटलं तर, तुमचं पुस्तक मूलभूत विचारांच्या विरुध्दच होणार जवळजवळ.

देवरस : पण आपले असलेले विचारच मूलभूत ठरण्याचे मार्ग सांगणार आहे की मी. मग प्रश्न कुठे येतोय ?

रमाबाई : मग छत्र्यांचा कारखाना लहान असावा, की मोठा असावा, याबद्दल तुमचा जो विचार आहे तो मूलभूत ठरवून दाखवा बरं तुम्ही -- म्हणजे मग ते परीक्षणही शोधत बसायला नको.

देवरस : नाही. ते परीक्षण जास्त मूलभूत होतं, हे कबूल करायलाच पाहिजे मला. केवळ मला एक आपलं मूलभूत विचार करता येतोय म्हणून बाकीच्यांचे विचार नामशेष करणं मला आवडणार नाही. स्वातंत्र्य ठेवलंच पाहिजे.

रमाबाई : फक्त मला नको स्वातंत्र्य !

देवरस : असं का ? तुलाही पाहिजे, मलाही पाहिजे – सगळ्यांनाच पाहिजे. तू छत्र्यांचा कारखाना काढून माझ्या स्वातंत्र्यावर आक्रमण होणार की नाही ? -- मग तू ते करायचं नाहीस. मी पुस्तक लिहिलंच नाही, तर कुणाच्या स्वातंत्र्याला बाध येतोय का ? -- नाही .. मग मी पुस्तक नाही लिहिलं तरी चालेल -- असं !

रमाबाई : थोडक्यात म्हणजे, आहे ते चालू ठेवायचा विचार दिसतोय तुमचा !

देवरस : छे,छे, जे काय करायचं ते नीट विचारानं करू या -- एवढंच !

( दारावरची बेल वाजते. रमाबाई जाऊन दार उघडतात. कर्नल प्रवेश करतात.)

रमाबाई : अहो, कर्नलसाहेब आलेत !

देवरस : या, या !

कर्नल : हाऊ डु यू डू ?

देवरस : ओ. के.

कर्नल : हे चुकतं बघा आपलं. एखाद्यानं विचारलं ' हाऊ डु यू डू ? ' तर तुम्हीही त्याच आपुलकीनं त्याला परत ' हाउ डु यू डू ? ' असं म्हटलं पाहिजे. आपण नुसतं ओ.के. म्हणून मोकळे होतो. म्हणजे आपलं नीट असणं एवढंच महत्त्वाचं आहे, असा अर्थ होतो त्याचा. हे बरोबर नाही.

देवरस : नाही. आमचं काय होतं ते मी सांगतो तुम्हाला -- तुम्ही आम्हाला एवढ्या प्रेमानं ' काय, कसं काय ? ' म्हणून विचारल्यावर ' ठीक आहे ' असं उत्तर न देता उलट तुम्हालाच ' काय, कसं काय ? ' असं विचारणं-- हा उध्दटपणा वाटतो आम्हाला. तुमच्या विचारण्याची -- प्रेमाची योग्य ती बूज राखून

' ठीक आहे ' असं म्हणण्यातच आम्हाला नम्रपणा वाटतो. तुम्हाला उत्तरच दिलं नाही तर, तुमचा तो अपमान होईल, असं वाटतं आम्हाला.

कर्नल : मॅनर्सच्या गोष्टी असतात ह्या ! याच्यात एवढा खोल विचार करायचा नसतो.

देवरस : खोल विचार करत नाहीच आम्ही. आपोआपच होतं ते. ते कसं होतं ते उलगडून सांगितल्यावर खोल वाटतं, इतकंच ! मराठी माणसाच्या नम्रपणामुळंच त्याच्याकडून मॅनर्सच्या चुका होतात.

कर्नल : नम्रपणा कसला आलाय यात ? न्यूनगंड म्हणा ! समोरच्या माणसाच्या आपण बरोबरीचे आहोत, असं का समजत नाही तुम्ही ? त्यानं आपुलकी दाखवली -- आपणही आपुलकी दाखवावी ! मुख्य म्हणजे न्यूनगंडच हा !

देवरस : पण आमच्यात न्यूनगंड आहे हे पाहून समोरच्या माणसाला जरा स्वत:चं महत्व वाढल्यासारखं वाटतं की नाही ! मग त्यानं त्याला न्यूनगंड न म्हणता नम्रपणाच म्हणावं -- तोच त्याचा नम्रपणा ठरेल ! नाहीतर मग आम्हीही त्याला उध्दट म्हणायचा उध्दटपणा करायला कमी करणार नाही. न्यूनगंड म्हणून आमचा स्वाभिमान नाही दुखावला जात ?

रमाबाई : जाऊ द्या हो. काय क्षुल्लक बाबतीत भांडत बसता --

कर्नल : ( हसून -- ) बरं, ठीक आहे. रमाबाईंचा छत्र्यांचा कारखाना कुठपर्यंत आला ?

देवरस : आता हे तुम्हाला कसं माहीत ?

कर्नल : आमची उमा म्हणत होती की, रमाबाई छत्र्यांचा कारखाना काढतायत म्हणून।

देवरस : कर्नल, आपली काय गंमत आहे नाही ! तुमच्या बायकोचं नांव उमा आणि माझं नाव उमाकांत देवरस -- माझ्या बायकोचं नाव रमा, तर तुम्ही कर्नल रमाकांत वज्रमुष्टी ! ( हसतात.)

कर्नल : एवढं अगदी तुम्हाला वाटत असेल तर, करून टाका अदलाबदल. आपल्याला आवडेल. आपण रमाबाईंना छत्र्यांचा कारखानासुध्दा काढून देऊ !

देवरस : नाही, काय आहे, माझं जरा प्रेम आहे हो तिच्यावर. तेच सांगत होतो मी तिला आत्ता. एरवी काय, प्रपोजल चांगलंच आहे तुमचं !

कर्नल : प्रेमाचं काय सांगताय ! मीसुध्दा हजारदा कबूल केलंय उमापुढं, की माझं तिच्यावर प्रेम आहे म्हणून.

देवरस : नुसतं तेवढंच नाही. आमची मुलंही जरा हेकट स्वभावाची आहेत हो ! आई किंवा वडील, कुणीच बदललेलं चालणार नाही त्यांना.

कर्नल : हां -- असं असेल तर राहू द्या ! मुलांसाठी त्याग केला पाहिजेच आपण ! सहज गंमत म्हणून बोललं, तरी फार गंभीरपणे उत्तरं देत बसता बुवा तुम्ही ! ते जाऊ द्या ! कारखान्याचं कुठपर्यंत आलं ?

देवरस : विचार चालू आहे.

कर्नल : ते कबूल आहे -- पण कारखाना काढण्याच्या दिशेनं विचार चालू आहे की न काढण्याच्या ?

रमाबाई : हं ! हा आता मूलभूत प्रश्न आहे -- द्या आता याचं मूलभूत उत्तर !

कर्नल : कारण काय आहे, की माझ्या पुतण्याचा छत्र्यांच्या काड्यांच्या उत्पादनाचा बिझनेस आहे वर्ध्याला. काड्या सवलतीच्या दरात मिळू शकतील तुम्हाला.

देवरस : छे छे ! माझ्या बायकोच्या छत्रीत तुमच्या पुतण्याच्या काड्या कशाला ! काड्याही आमच्या आम्ही घालू ! आधी आम्ही काड्यांचं उत्पादन चालू करू -- मग छत्र्यांचं !

रमाबाई : बिनकाड्यांच्या छत्रीचाही एक नमूना दिलाय त्या पुस्तकात --

देवरस : फक्त आपल्या देशातील परिस्थिती बघायला पाहिजे -- एवढंच !

रमाबाई : ( कर्नलना -- ) अहो, कुठलंतरी ते न आठवणारं परीक्षण वाचून आलेत आणि तेवढ्यासाठी सबंध

कारखाना अडवून ठेवलाय त्यांनी.

देवरस : हे बघ, आता पुन्हा तीच तीच चर्चा नको. मी आहे माझ्या पुस्तकाच्या गडबडीत. त्यात तुझं एक किरकोळ हे कारखान्याचं नको मधेमधे.

कर्नल : पुस्तकाची कसली गडबड म्हणालात ?

रमाबाई : ( देवरसांना थांबवत -- ) थांबा, छत्र्यांचं नको तर पुस्तकाचं पण नको.

देवरस : बरं, राह्यलं ! सध्या एवढंच सांगून ठेवतो की, मी एक पुस्तक ल्याह्यच्या विचारात आहे. सुमारे साडेचारशे पानांचं होईल. किंमत रुपये आठशे एकोणसत्तर.

कर्नल : ( उत्सुकतेने --) म्हणजे --

रमाबाई : नाही म्हणजे नाही. हा पण विषय बंद. ( कर्नलची उत्सुकता दडपली जाते ).

देवरस : अग, मी लिहिणार नाही फार तर ते पुस्तक. पण नुसतं बोलायला काय हरकत आहे ? अं ?

रमाबाई : नाही म्हणजे नाही.

कर्नल : हे म्हणजे मला नुसताच हा एक उगीच धक्का बसला आणि उलगडा मात्र झाला नाही.

रमाबाई : ( देवरसांना -- ) मग आधी छत्र्यांचं बोला. बिनकाड्यांच्या छत्र्या काढायच्या का ?

कर्नल : बिनकाड्यांच्या छत्र्या ?

रमाबाई : होय, असू शकतात.

कर्नल : आणि उघडणार कशा त्या ?

देवरस : कुठलं काय घेऊन बसलात ! आपल्या देशाचा आधी आढावा घ्यायला नको ?

कर्नल : आढावा घ्याल हो. पण बिनकाड्यांच्या छत्र्या ? दांडे तरी असणार की नाही त्यांना ?

देवरस : दांडे पण नाही -- नुसतं कापड --

कर्नल : मग मी म्हणतो, तुम्ही रेनकोटच का नाही काढत ? छत्र्या कशाला काढता ?

देवरस : रेनकोट काढायचे झाले, तर ते आम्ही काड्या आणि दांडे असलेले काढणार. नवीन. एक आपलं आकर्षण.

कर्नल : अहो, पण काड्या टोचतील की ? आणि दांडा कुठं राहणार त्यांचा ?

रमाबाई : आम्ही रेनकोट काढणार नाही. छत्र्याच काढणार. छत्र्याच फायदेशीर असतात.

कर्नल : ठीक आहे -- पण -- बिनकाड्यांच्या छत्र्या म्हणजे --( छत्री उघडायचा अभिनय करून पाहतात -- पण जमत नाही --) मला नाही वाटत अशा छत्र्या खपतीलसं ! कठीण आहे !

रमाबाई : तुम्ही तशी छत्री बघितलेली नाही म्हणून वाटतंय तसं तुम्हाला.

कर्नल : नाही, ते ठीक आहे. पण अशा छत्र्या तुम्ही काढणार, म्हणजे मग काड्यांचं उत्पादन करणारे मेलेच की !

रमाबाई : त्याला आम्ही काय करणार ! नव्या सुधारणा येतात तेव्हा, काही जुन्या गोष्टी जाणारच !

कर्नल : बरं मग तुमच्या या छत्र्यांना दुसरे काही पार्टस् लागतील की नाही ? का कापडच नुसतं ?

देवरस : बरं, इतका वेळ आपण छत्र्यांना दिलेला आहे -- आता दहा मिनिटं तरी माझ्या पुस्तकाला मिळाली पाहिजेत.

कर्नल : बरं, एक मिनिट. मी काय म्हणतो, मधेच मी जरा माझं एक बोलून घेऊ का ? कारण काय होतंय -- मी आल्यापासून तुम्ही हे जे दणके देत सुटलाय, त्यात माझं राहून जातंय. मी, मुख्य म्हणजे, जरा सल्लामसलतीला आलो होतो. म्हणजे तसं विचार-विनिमयालाच म्हणा. काय आहे की, या सगळ्या गडबडीत ते राहून जातंय. उमा पण येतेच आहे एवढ्यात.( उमाबाई येतात.),

उमाबाई : हं, काय विचार ठरला मग ? काय ठरवलं ?

कर्नल : नाही, अजून सांगतोच आहे मी.

उमाबाई : म्हणजे ? अजून सांगितलं नाही ? एवढा वेळ काय करताय मग ?

देवरस : अहो, हिचं ते छत्र्यांचं चाललं होतं -- जाऊ द्या -- हं-- सांगा कर्नलसाहेब --

कर्नल : तुम्हाला कितीदा सांगितलं की, तुम्ही मला नुसतं कर्नल म्हणत चला. कर्नलसाहेब नको --

देवरस : असू दे. सांगा.

उमाबाई : रमाबाई, छत्र्यांच्या कारखान्याचं ठरलं वाटतं ? जोर आहे बाई तुमचा --

देवरस : ते छत्र्यांचं थांबवा हो -- हं -- बोला --

कर्नल : तर मध्यप्रदेशात टेंभा नावाचा एक मतदारसंघ आहे.

देवरस : हं.

कर्नल : तर रूलिंग पार्टीकडनं मला अशी ऑफर आलीय की, त्यांच्या पार्टीतर्फे मी तिथं निवडणुकीला उभं राहावं. थोडक्यात म्हणजे ते मला तिकीट देतायत.

देवरस : का -- तिथला स्थानिक कुणी मिळाला नाही काय त्यांना ?

कर्नल : सगळीकडे स्थानिकच उमेदवार असतात हो. फक्त एक दोन मतदारसंघातच हे अपवादात्मक होणार आहे.

देवरस : कुठं कुठं ?

कर्नल : एक म्हणजे स्वत: पंतप्रधान ज्या मतदारसंघात उभे राहताहेत, तिथले ते स्थानिक कार्यकर्ते नाहीत. आणि दुसरा हा माझा मतदारसंघ -- टेंभा.

देवरस : मग पुढं काय ? मंत्रिमंडळात वगैरे जाण्याची शक्यता ?

कर्नल : ते निवडून आल्यानंतरचं हो -- अर्थात उभा राहिलो तर, निवडून येईनच मी -- तो प्रश्न नाही --

देवरस : मग प्रश्न काय आहे तरी काय ?

कर्नल : उभं राहावं की न राहावं -- ही ऑफर स्वीकारावी की नाही -- हा प्रश्न आहे.

देवरस : कमाल करताय ! तिकीट मिळतंय म्हटल्यावर उभं राह्यचंच ! नाही तरी तुम्हाला काय उद्योग आहे आता ?

कर्नल : नाही, त्याचं काय आहे -- हिचा जरा विरोध आहे याला --

देवरस : उमाबाईंचा ? का बुवा ?

कर्नल : हिचं गेली दहा वर्षं चाललंय की, आपण जाऊन अमेरिकेत स्थायिक होऊ या -- तिची कुणीतरी मैत्रिण तिकडे असते !

उमाबाई : तेच म्हणते मी -- कुठं मंत्री न् संत्री होत बसताय इथं -- जाऊ चांगलं अमेरिकेत -- तर ते नाही -- यांना भुरळ पडलीय !

देवरस : नाही, पण मी काय म्हणतो, तुमच्या मैत्रिणीच्या मागं कर्नलना कशाला पळवताय ? राहीनात का ते इथं उभे निवांत ?

रमाबाई : उमाबाई अमेरिकेत गेल्या तर आपण पण जायचं हं ? मला इथं करमायचं नाही मग !

( देवरस सचिंतपणे पाहात राहतात.)

देवरस : हे बघ, मी सांगून ठेवतो तुला. समज, उमाबाई आणि कर्नल गेले अमेरिकेला आणि दरम्यानच्या काळात मला जर अशी उभं राह्यची ऑफर आली -- तर मी कुणाचंही ऐकणार नाही. जाणार आणि थेट उभा राहणार -- मग तो टेंभा मतदारसंघ का असेना --

कर्नल : म्हणजे टेंभा मतदारसंघ काय कमी समजताय का काय तुम्ही ?

देवरस : तसं नव्हे हो. एक आपलं सांगितलं.

कर्नल : तर असा हा पेच आहे. म्हटलं, जरा आपण सगळयांनी मिळून विचार करावा आणि ठरवावं काय ते !

देवरस : मघाशी तुम्ही अदलाबदलीला एकदम खुशीनं का तयार झाला होतात, ते आता लक्षात आलं माझ्या ! म्हणजे मला अमेरिकेला रवाना करायचा बेत होता तुमचा !

कर्नल : तसं काही नाही हो -- उगीच आपलं गंमत म्हणून म्हटलं होतं मी.

देवरस : नाही. असू दे. पण आम्ही देशाभिमानी माणसं आहोत, हे लक्षात ठेवा तुम्ही. हा देश सोडून आम्ही कुठंही जाणार नाही.

कर्नल : आता मग मी काय देशाभिमानी असल्याशिवाय उभं राहायचं म्हणतोय काय ?

उमाबाई : उभं राहणं म्हणजे देशाभिमान ?

देवरस : ठीक आहे. मी तुम्हाला बरोबर सांगतो आता. समजा, बरं का उमाबाई, तुम्ही आणि कर्नल -- दोघांनीही एकमेकांचं ऐकायचं नाही असं ठरवलं -- अं -- तर काय होणार -- तुम्ही अमेरिकेलाही जायचं नाही आणि कर्नलनी उभंही राह्यचं नाही -- होय की नाही ? मग मी काय म्हणतो -- एवीतेवी अमेरिकेला नाहीच जात तर उभं राहीनात का कर्नल ?

उमाबाई : वा,वा,वा ! आम्ही इथं आहोत म्हणून म्हणता येतंय तुम्हांला असं ! हेच आपण सगळेच अमेरिकेत असतो तर काय निघालं असतं ?

देवरस : हं -- हे नव्हतं माझ्या लक्षांत आलं !

कर्नल : अहो देवरस, रमाबाईंचं जितकं सोपं आहे, तसं नाहीय आमचं !

रमाबाई : आता मला यात सोपं म्हणायचं काय कारण ? आपल्या बायकोच्या बुध्दीचं कौतुक दुसऱ्यांना न हिणवता करावं माणसानं --

कर्नल : अहो, उलट चांगलं बोललो मी तुमच्याबद्दल. हिच्याससमोर तुमच्याबद्दल सरळ चांगलं बोलून कसं चालेल ?

उमाबाई : हे बघा, आपण अमेरिकेला जायचं म्हणजे जायचं ! उभं राह्यचं नाही न् काही नाही ! उभे कसले राहताय !

देवरस : हळूहळू आता ही चर्चा, ‘ कर्नल उभे राहिले, आम्ही नाही पाहिले --’ या दिशेनं जाणारसं वाटतंय – माझ्या पुस्तकात मी एका छोट्याशा प्रकरणाची भर टाकायला पाहिजे -- प्रकरणाचं नाव -- ‘ हटवादी विचार ’--‘ हटवादी विचार ’ हे प्रकरण फक्त अर्ध्या ते पाऊण पानाचंच असेल पण आख्खं पुस्तक खाऊन टाकेल हे प्रकरण ! पुस्तकाची किंमत रुपये आठशे अठ्ठ्याहत्तर !

रमाबाई : तुमचं पुस्तक मात्र तुम्ही वाढवत चाललाय आणि आमच्या छत्र्यांचं तेवढं लोंबकळत ठेवलंय -- कुठल्या त्या फडतूस परीक्षणासाठी -- आता परत जर तुम्ही तुमच्या पुस्तकाचं बोललात तर, मी तडक जाणार आणि ऑर्डर देऊन येणार -- कारखान्याच्या बोर्डाची ‘ रमा छत्री ’!

देवरस : लोकांना ‘ रमा छत्री ’-- आम्हाला ‘ मार छत्री ’ ! ( यावर कर्नल मोठ्यांदा हसू लागतात, तर रमाबाई रडायच्या बेताला येतात.)

रमाबाई : क्रूर आहात तुम्ही -- क्रूर आहात ! माझ्या नावाचीसुध्दा टिंगल करावीशी वाटते तुम्हाला ... नुसतं म्हणायचं .. प्रेम आहे म्हणून ...( डोळे टिपू लागतात. कर्नल हसू आवरून गंभीर झालेले....)

कर्नल : अरे – अरे --

उमाबाई : इतकं काय वाईट वाटून घेताय रमाबाई ! अं ! असं काय ते ! थांबा ! चला ! छे ।

देवरस : आता हा अश्रूंचा पाऊस जर सुरू झाला, तर छत्र्यांचा कारखाना काढावा लागणारच आम्हाला ! मग आमचे विचार कितीही मूलभूत असोत ! या असल्या पावसाळी हवेत कसला दगडाचा मूलभूत विचार करणार ! धिस् इज नथिंग बट् टी वेदर ! हवा अशी पडलीय की बस्स -- चहा पाहिजेच ! काय कर्नल ?

कर्नल : होय होय. यू आर राईट !

उमाबाई : ( रामाबाईंना ) चला बघू आत... आपण चहा करूया... अं...( दोघीही आत जातात.)

देवरस : कर्नल, या बायकांच्यामुळे आपलं कर्तृत्व मारलं जातं असं नाही तुम्हाला वाटत ?

कर्नल : अगदी खरं आहे. पण करायचं काय !

देवरस : त्यांना वाटतं की, आपण नुसतं कुटुंबवत्सल राहावं आणि कायम नवरा ही एकच भूमिका पार पाडत राहावं.

कर्नल : याला माणूस बळी पडला की, कर्तृत्व संपलंच हो ! तर मी तुमच्याकडे मुद्दाम का आलोय ते सांगतो तुम्हाला. उमाचं काय आहे की, ती माझ्या विरुध्द जरूर असते, पण दुसऱ्या पुरुषांनी जर काही समजावून सांगितलं तिला, तर पटवून घेऊ शकते ती.

देवरस : अहो, पण तुमच्या इतकाच माझाही परिचय आहे त्यांना. माझीही पत्रास ठेवणार नाहीत त्या.

कर्नल : हे बघा, तुमच्या छत्र्यांच्या कारखान्याचं रद्द करायचं माझ्याकडं लागलं. तुम्ही आमची अमेरिका रद्द करून द्यायची.

देवरस : म्हणजे हिच्याबद्दल, माझ्यापेक्षा तुम्हाला जास्त आत्मविश्वास दिसतोय.!

कर्नल : देवरस, तुम्ही प्रत्येक गोष्टीला एकदम अनैतिक स्वरूप देता; हे बरं नाही.

देवरस : म्हणजे होणार काय यात -- छत्र्यांचा कारखाना रद्द -- अमेरिका रद्द -- माझं पुस्तक रद्द -- कारण पुस्तकाचं कुठल्याही परिस्थितीत रद्द होणारच आहे -- आणि तुम्ही मात्र तुमच्या मनासारखे उभे राहणार, म्हणजे तुम्हाला उभं राहता यावं म्हणून आम्हा तिघांची आयुष्यं निरर्थक करायला तयार झाला आहात तुम्ही. हा स्वार्थीपणा होतोय.

कर्नल : अहो, पण निवडून आल्यावर मला देशसेवा नाही का करता येणार ? त्यात किती हजारो लोकांचा फायदा होईल ! हे का नाही विचारात घेत तुम्ही ?

देवरस : ते काय, तुम्ही नाही गेलात तरी, दुसरं कुणी तरी करेल. उभं राह्यला खूप लोक तयार असतात.

कर्नल : तुमच्या या एकूण विचारांचा अर्थ आला माझ्या ध्यानात. तुम्हाला आणखी काहीतरी हवं आहे.

देवरस : म्हणजे ही काय सौदेबाजी चाललीय असं समजता का काय तुम्ही ?

कर्नल : बरं, राह्यलं ! मग आता नेमकं काय करावं असं तुमचं म्हणणं आहे ते सांगून टाका. फाफटपसारा नको.

देवरस : मी या बदल्यात हिला आणि उमाबाईंना घेऊन एक अमेरिका-ट्रिप करून यावी म्हणतो. सगळ्यांनाच न्याय मिळाला पाहिजे. उमाबाईंचीही इच्छा अगदीच मारून टाकावी असं मला वाटत नाही.

कर्नल : मग मी असं म्हणतो की, रमाबाईंना राहू द्यात इथं -- मी त्यांना कारखानाही देईन काढून -- शिवाय मला उभं राह्यलाही त्यांची मदत होऊ शकेल.

देवरस : अहो, पण उमाबाईंना सोडून ती राह्यची नाही । म्हणजे उमाबाईंना मी घेऊन चाललो की, ती आपोआप येणारच बरोबर !

कर्नल : अच्छा ! म्हणजे ये बात है ! ( जरा वेळ विचार करून --) आपलं उभं राह्यचं पण रद्द ! विचारच नको मग या बाबतीत -- मी उभा राहातच नाही -- उद्याच कळवून टाकतो मी --

देवरस : पण इतकी घाई का करताय तुम्ही ? दुसरा काही मार्ग निघतो का ते बघू आपण.

कर्नल : नकोच ते. आम्हाला नुसतं उभं करून तुम्ही साधून घेणार सगळं ! इतकं करून मी निवडून न येता पडलो म्हणजे संपलंच ! नको. हे धोक्याचं आहे सगळंच.

देवरस : अहो पण --

कर्नल : नको, नको. हा इथल्या इथं बारीकसारीक धूर्तपणासुध्दा जमत नाहीय मला आणि निवडून येऊन काय करणार मी ! आणि निवडून तरी कसा येणार ! शक्य नाही.

देवरस : अहो, पण निवडणुकीला उभं राह्यचं म्हणजे अशी खूप मोठ्या प्रमाणावर देवाणघेवाण करावीच लागते ! सुरुवातीलाच कसे काय बिचकता तुम्ही एवढे ! सगळ्यांना न्याय देत जाणाराच निवडून येऊ शकतो !

कर्नल : न्यायाधीश न होता निवडून येता आलं असतं तर इच्छा होती माझी. न्यायाधीश होणं काही पेलणार नाही मला.

देवरस : या अशा वृत्तीमुळंच सुट्टीच्या दिवशी संध्याकाळी चहा पीत पीत आयुष्यं संपून जातात आपली ! आव्हानं अशी घेतच नाही आपण कुठली !

कर्नल : असू दे -- चहा येईल एवढ्यात -- आता इतकंच करायचं -- तुमच्या छत्र्या रद्द करून घ्यायच्या आणि आमची अमेरिका रद्द करून घ्यायची ! बस्स !

देवरस : हं -- हे ठीक आहे -- मान्य -- ठरलं.

( उमाबाई आणि रमाबाई चहा घेऊन येतात. सगळे चहा पितात. चहा पिताना कर्नलचं एखादं वाक्य -- रमाबाईंना --‘ काय राग गेला की नाही ? ’ मग --)

देवरस : तर मी आणि कर्नल उद्याच निघतोय. टेंभ्याला जायला. मी एक-दोन महिन्यांची रजा घेतोय. म्हणजे कर्नलच्या निवडणूक प्रचारालाही मला जरा हातभार लावता येईल आणि माझ्या त्या ‘ आदर्श विचारा ’ चंही आटपून टाकता येईल. तिकडं टेंभ्यातच हे पुस्तकही लिहून पूर्ण करावं म्हणतोय मी . तुम्ही दोघी इथं काहीही करा -- छत्र्यांचा कारखाना काढा, नाही तर अमेरिकेला जा -- ( या पवित्र्याचे कर्नलला अत्यंत कौतुक --)

उमाबाई : ( कर्नलना -- ) कसे हुरळून गेलेत बघा लगेच. उभे राहतायत !

रमाबाई : आपलं ते खरं करायची वृत्ती आहे यांचीसुध्दा ! काय मेले ते आदर्श विचारांचे दिवे लावणार आहेत ते त्यांचे त्यांना माहीत !

उमाबाई : मग तुम्हीही लक्ष द्या आता. आम्हीही काही निर्णय घेतलेला आहे. आम्ही दोघी जाणार अमेरिकेला. रमाबाई तिथं काढतील छत्रीचा कारखाना. तिथून आम्ही छत्र्या इकडे निर्यात करू. म्हणजे आपल्या देशातली परिस्थिती विचारात घ्यायचाही प्रश्न नाही. अमेरिकेतली परिस्थिती विचारात घ्यायचं कारणच नाही. कारण आम्ही छत्र्या इकडे पाठणार आहोत !

कर्नल : म्हणजे तूही गेलीस का काय त्यांच्या छत्रीत ?

उमाबाई : मग तुम्ही दोघे काहीही करा. टेंभ्याला जाऊन उभे राहा, नाहीतर आदर्श विचार करा. आम्ही चाललो.

देवरस : मग हे सोपं झालं की हो कर्नल !

रमाबाई : ( वेडावत -- ) स्योप्पं झ्यालं की हो क्यर्नल ! काही नाही. आम्हीही कुठे जाणार नाही आणि तुम्हीही कुठे जायचं नाही. बघतेच मी --

देवरस : म्हणजे हे नुसतं आहे ते चालू ठेवायचं धोरण झालं !

रमाबाई : असू दे !

उमाबाई : रमाबाई, तुम्ही फार लौकर अधीर होता बघा, असं चालत नाही.

कर्नल : बरं मी काय म्हणतो, उगीच वाद कशाला ? आहे ते चालू ठेवू या झालं ! काय ?

देवरस : नाही, मला हे पटत नाही -- चांगल्या संधी आहेत आपल्याला तर --

रमाबाई : मग आम्हाला नाहीत संधी ?

देवरस : हे बघा, तुम्हाला जर भांडत बसायचं असेल तर, सगळंच रद्द करून टाकू या ! कुणाचंच, काहीच नको ! तुमचंही नको आणि आमचंही नको ! पण हे तुम्हाला चालायचं नाही -- मग आम्हीच का ?

दोघीही : चालेल आम्हाला !

कर्नल : ( उठून उडी मारत --) अरे ! जमलं !

उमाबाई : हे वाटलंच होतं मला. तुम्हाला नाहीतरी काय जमणार होतं ? कॅन्सल झाल्यावर अगदी उड्या मारताय ते ?

देवरस : हे असं बरोबर नाही हं उमाबाई. कर्नलना असं तुम्ही निरुत्साही करत जाऊ नका. शेवटी काय आहे, आपल्याला सगळ्यांना काही ना काही करायचं होतं -- पण एकमेकांची मनं मारून त्या गोष्टी करायच्या, म्हणजे मनावर ओझं येत होतं की नाही ? ते करायचं सगळं रद्द झाल्यावर मनावरचं ओझं गेल्यासारखं वाटतं की नाही ? हेच महत्त्वाचं आहे. शेवटी एखादी गोष्ट न होण्याच्या दु:खापेक्षा मनावरचं ओझं जाण्याचा आनंद मोठा आहे.

कर्नल : देवरस, तुम्हीसुध्दा उभे राहू शकला असतात.

उमाबाई : ( मधेच काही आठवून -- पर्स शोधत -- त्यातून एक लखोटा काढत -- ) बघितलंत ! हे असं होतं – येतायेता लक्ष गेलं, तर दारामागं एक लखोटा पडला होता यांच्या नावचा -- तो आणला मी बरोबर -- पण द्यायचीच विसरले – हं -- हा घ्या --

कर्नल : बघू --( चष्मा लावून वाचत --) लाल शाईत लिहिलंय – हं --‘ तुम्ही जर टेंभा मतदार संघात उभे राह्यलात तर, तुमच्या मुंबईतल्या मुलाचा जीव धोक्यात येईल -- आपला, हितचिंतक ’! वाह ! पण आता कुठं काय प्रश्न येतोय ? आम्ही इथं -- मुलगा मुंबईत -- आणि टेंभा मतदार संघ टेंभ्याला ! ( हसायला लागतात... हळूहळू सगळे सामील होत जातात...) आता कुठं काय प्रश्न येतोय ! --

देवरस : हा ज्योकच झाला एक ! --

रमाबाई : म्हणजे आपले सगळ्यांचेच डाव यशस्वी झाले बघा --

उमाबाई : काही तरी घोटाळे तयार करत असतात बाई हे -- पण आपोआपच सुटतात त्यातून ....
( सगळेच हसत आहेत -- हसताहसता कर्नल ते पत्र फाडून त्याचे चिटोरे करतात आणि उधळतात -- कर्नल कागदाचे चिटोरे उडवताहेत आणि सगळे हसताहेत. याच वेळी दारात दिनकर पुरोहित येतो.)

पुरोहित : मी .. मी जरा आत येऊ का ? ( लक्ष जात नाही. दारावर बोट वाजवून --) श्रीयुत देवरस, मी आत येऊ का जरा ? ( प्रथम उमाबाईंचे लक्ष जाते.)

उमाबाई : अहो देवरस, तुमच्याकडे कोण आलेत बघा.
( सगळे हसायचं थांबत तिकडे पाहतात.)

देवरस : या हो ! या -- बसा !

पुरोहित : मी आपल्याकडे एका महत्त्वाच्या कामासाठी आलो आहे. आपली एकमेकांची ओळख नाही. पण तुमची ओळख आता मी पूर्ण करून घेतलेली आहे. फक्त माझीच ओळख तुम्हाला करून देतो आधी.

कर्नल : आमची कशी काय ओळख करून घेतली बुवा तुम्ही ?

पुरोहित : दारावर उमाकांत देवरस ही पाटी आहे. ( कर्नलना-- ) तर उमाकांत देवरस म्हणजे हेच -- तुम्ही असू शकत नाही.

कर्नल : का बुवा ! माझंही नाव उमाकांत देवरस असू शकलं नसतं ?

पुरोहित : बरं, याचा खुलासा करतो मी. मला पोलीस डिपार्टमेंटकडून एका महत्त्वाच्या कामगिरीवर इथं पाठवण्यात आलेलं आहे. कामगिरी काय आहे ते सांगतोच मी, परंतु आधी हे नावाचं बोलू.

देवरस : मुळात तुम्ही पोलीसातनं आलाय हे कशावरून ?

वुरोहित : बरोबर, देवरस आडनावाचा माणूस हा प्रश्न विचारणारच. पुरावाही दाखवतो मी माझ्याबद्दल.

कर्नल : हं -- नावाचं काय म्हणत होता ?

पुरोहित : पोलिसांना, गुन्हेगार शोधून काढण्यासाठी उपयोगी पडतील अशा अनेक शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो. त्यात नामशास्त्र हा एक विषय आहे. माणूस पाहून त्याचं नाव काय असू शकेल याचे अंदाज बांधता येण्यासाठी या शास्त्राचा फार उपयोग होतो. अलिकडे तर या शास्त्रात सतत भर पडत असून ते अधिकाधिक निर्दोष केलं जात आहे. मुख्य म्हणजे माणसाच्या नावाचा त्याच्या व्यक्तिमत्वावर फार मोठा परिणाम होत असतो -- या गृहीत कृत्यावर हे शास्त्र आधारलेलं आहे. ' नाव मोठं लक्षण खोटं ' अशा म्हणीतून जो एक विरोध दाखवला जातो तो खरा नाही. आपण नुसतं नावाच्या अर्थाचा विचार करतो. हे अगदी ढोबळ झालं. नावाची अक्षरं -- त्यांची रचना -- विशिष्ट काळात त्या अक्षरांचे -- नावांचे होणारे परिणाम -- हे सगळं लक्षात घ्यावं लागतं. बरंच सूक्ष्म विचार करणारं शास्त्र आहे हे.

कर्नल : हे बघा, आम्हाला ते सगळं शास्त्र काही शिकायची इच्छा नाही. आत्ता देवरसांना एक तुम्ही बरोबर ओळखलंत. आता आमची तिघांची नावं ओळखून दाखवा बघू.

पुरोहित : ठीक आहे. मी उघड विचार सांगतच तुमच्या नावांपर्यंत कसा पोचतो बघा. आता तुम्ही आणि देवरस जरा अती आशावादी -- म्हणजे आमच्या शास्त्रात ज्याला आशाळभूत व्यक्तिमत्व म्हणतात -- त्यात मोडता. याचं एक कारण असं असू शकतं की, तुमच्या बायकांच्या नावात 'प ' या अक्षराला स्थान नसून ' म ' हे अक्षर महत्त्वाचं असलं पाहिजे. ( रमाबाईंचा निर्देश करत ) आता हा जर पुरुष असता, तर व्यक्तिमत्वात थोडा फरक असता हे तर खरंच -- पण साधारण असं व्यक्तिमत्व -- असा आविर्भाव असलेलं -- म्हणजे यांचं नाव ' राम ' असतं, पण या स्त्री आहेत -- त्या अर्थी यांचं नाव ' रमा ' असावं. आहे का ?

रमाबाई : कमाल आहे बाई !

पुरोहित : ( कर्नलना -- ) आता यांच्या आणि तुमच्या व्यक्तिमत्वात बरीच साम्यस्थळं आहेत. अधीरेपण, डावपेचीपणाचा अभाव, थोडासा भोळेपणा -- हे सगळं लक्षात घेतलं तर, तुमचं नाव रमाकांत असायला पाहिजे.

कर्नल : ( उठून त्या माणसाशी शेकहॅन्ड करत -- ) मान लिया ! करेक्ट !

पुरोहित : आता राहता राहिल्या या बाई -- यांचं नाव सुमन असून यांना सुमा तरी म्हणत असावेत किंवा यांचं नाव उमा तरी असावं.

रमाबाई : बरोबर. उमाच आहे यांचं नाव !

पुरोहित : अर्थात सुमा नसून उमाच, हेही मला निश्चित सांगता आलं असतं.

कर्नल : आलं असतं बुवा. मान्य आहे.

पुरोहित : तर या रमाबाई म्हणजे ( कर्नलकडे बोट --) यांच्या पत्नी आणि उमाबाई म्हणजे देवरसांच्या पत्नी. बरोबर ?

चौघेही : चूक !

देवरस : हे चुकलं तुमचं.

| | | |
|---|---|---|
| पुरोहित | : | शक्य आहे. चुकलं असेलच. याचं कारण सांगतो मी तुम्हाला. नात्यांबद्दल बोलताना मी माझ्या बुध्दीनं विचार न करता -- शास्त्राधारानंच मी पुढं गेलो असतो तर हेही चुकलं नसतं. रमा -- रमाकांत, उमा--उमाकांत असा खुळचट ढोबळ विचार केला मी मनातल्या मनात, म्हणूनच चुकलं. |
| देवरस | : | बरं ते राहू द्या -- तुम्ही कोण ते सांगा. |
| पुरोहित | : | ( खिशातून आय-कार्ड काढून देवरसना दाखवत --) हं -- हे माझं आयडेंटिटी कार्ड, डिपार्टमेंटनं दिलेलं. काय नाव लिहिलंय ? |
| देवरस | : | दिनकर लक्ष्मण पुरोहित. (कार्ड परत घेताना रुमालात घेऊन जपून खिशात ठेवतो.) |
| पुरोहित | : | हं -- दिनकर पुरोहित. तर दिनकर पुरोहित याच नावाचा आणखी एक माणूस इथं येणार आहे. त्याला वाचवण्याच्या कामगिरीवर मी आलो आहे. |
| देवरस | : | म्हणजे ? |
| पुरोहित | : | आतापर्यंत तुम्ही मला एक माणूस एवढंच समजत होता. तुम्हाला आमचं शास्त्र माहीत असतं तर, तुम्ही ओळखलं असतं की मी दिनकर पुरोहित आहे. ते असो. तर पत्ता हाच. घर हेच. यात चूक नाही. तर मला कृपया असं सांगा की, तुम्ही कुणी दिनकर पुरोहित या नावाच्या माणसाला ओळखता काय ? |
| चौघेही | : | ( आळीपाळीने -- ) नाही -- |
| पुरोहित | : | म्हणजे तुमच्या आयुष्यात जी जी माणसं येऊन गेली, त्यात दिनकर पुरोहित नव्हताच अशी खात्री आहे तुमची ? |
| देवरस | : | नाही -- तशी खात्री देता येणार नाही -- पण आता आम्हाला असा कुणी माणूस माहिती नाही किंवा आठवत नाही. |
| कर्नल | : | करेक्ट ! |
| पुरोहित | : | ठीक आहे. |
| कर्नल | : | बरं पुरोहित, त्या दुसऱ्या दिनकर पुरोहितला वाचवण्याचा काय प्रश्न आहे ? |
| पुरोहित | : | ( जरा विचार करून --) त्याचा थोड्याच वेळात इथं खून होणार आहे. |
| देवरस | : | इथं ! आमच्या घरात ? |
| पुरोहित | : | होय इथंच -- |
| कर्नल | : | इथं कशाला येतोय पण तो मरायला ? आणि मारणार तरी कोण त्याला ? |
| पुरोहित | : | ते मला माहिती नाही. परंतु तो इथं येणार आणि त्याचा खून होणार -- ही मला मिळालेली माहिती अत्यंत महत्त्वाची -- विश्वासार्ह -- आणि बिनचूक आहे. आता सव्वासात होताहेत. साधारण साडेआठच्या सुमाराला ही घटना घडणार आहे. तो खून टाळण्यासाठीच मी इथं थांबणार आहे. |
| देवरस | : | आमच्या घरात ? काय संबंध ? आमच्या घरात नको ही असली भानगड. |
| पुरोहित | : | तुम्ही नको म्हणून काय फरक पडणार ? |
| कर्नल | : | बरं, पण तुम्हीही दिनकर पुरोहित आणि तोही दिनकर पुरोहित -- हा योगायोग कसा ? |
| पुरोहित | : | एकदा ‘ योगायोग ’ म्हटल्यावर, पुढं - ‘ कसा ’ हा प्रश्न येऊ शकत नाही. |
| देवरस | : | ते जाऊ द्या हो कर्नल -- ( बायका आपसात घाबरून चर्चा करताहेत --) |
| देवरस | : | आणि तुम्ही दोघी गप्प बसा बघू जरा. हं -- तर आम्ही सरळ घराला कुलूप लावून बाहेरच निघून जातो. आमच्या घरात हे असलं खूनबीन नको. काय कर्नल ? बाहेर जाऊ आणि नऊ-साडेनऊनंतर परत येऊ. |
| पुरोहित | : | अशी टाळाटाळी करू नका. तुम्ही परत येऊन कुलूप काढून दार उघडाल आणि समोर दिनकर |

पुरोहितचा मुडदा पडलेला दिसेल तुम्हाला. स्व:त:चा त्रास वाचवण्यासाठी दुसऱ्या माणसाबद्दल असे बेपर्वा होऊ नका. मला इथं थांबणं भाग आहे. आणि तुम्ही घरात नसताना मी इथं थांबू शकत नाही.

देवरस : पण कुलूप असल्यावर आत कसे येतील ते लोक ?

पुरोहित : असले फालतू -- ढोबळ प्रश्न विचारत बसू नका. बाब गंभीर आहे. एका माणसाच्या जिवाचा प्रश्न आहे.

देवरस : पण, आपण इथं कुलूप लावू -- आणि समोरच्या घरात बसून लक्ष ठेवू की !

पुरोहित : आमच्या कामाच्या काही पध्दती आहेत. मी सांगतोय तसंच होईल हे. त्याचा खून नुसता आत्तापुरता टाळायचा नसून कायमचा टाळायचा आहे -- निदान या बाबतीतला -- हे लक्षात घ्या आणि माझ्या कामात कुठलाही विक्षेप आणू नका. थोड्याच वेळात इथं दिनकर पुरोहित येईल. त्याला आत घ्या. नंतर तुम्ही त्याच्याशी गप्पा मारत बसायचं आहे. पुढचं मी पाहून घेईन.

उमाबाई : अहो, एखादे वेळी यांनाच त्याचा खून करायचा असेल --

पुरोहित : तसं असतं तर मी हे उघड बोलून ठेवलं असतं का ? कृपया शंकाकुशंका काढू नका. शांत रहा. मी खून होऊ देणार नाही.

देवरस : ही बळजबरीच झाली --

पुरोहित : फक्त थोड्या वेळाचा प्रश्न आहे -- शेवटी आभार मानाल तुम्ही माझे. मला खात्री आहे.

उमाबाई : उगीचच थांबलो आपण इथं. यांचं एक ते उभं राह्यचं फालतू निघालं नसतं, तर फिरायला नसतो गेलो आपण ! ? हा प्रश्नच आला नसता.--

पुरोहित : तसं काहीही नाहीय. या घरावर सकाळपासून पाळत आहे माझी. मी कुठंही जाऊ दिलं नसतं तुम्हाला. ते असो. हा विषय विसरून जा आता. वातावरण उगीचच गंभीर करू नका. हं. बरं, हे कागदाचे चिटोरे कसले पडलेत इथे ? -- चला -- याच विषयापासून आपण गप्पा सुरू करू.

कर्नल : हं -- थांबा. हे मीच सांगतो. काय आहे, मी मध्यप्रदेशातल्या टेंभा मतदारसंघातून उभा राहतोय, येत्या निवडणुकीत. तर मला आलं होतं एक धमकीचं पत्र -- की मी जर उभा राहिलो, तर मुंबईतल्या माझ्या मुलाचा खून होईल म्हणून. मग तर म्हटलं राहणारच मी उभा. असल्या धमक्यांना भिऊन माघार घेणारा मी नव्हे.

पुरोहित : मला वाटतं निश्चितपणे उभा राहणारा माणूस अशी पत्रं, अशा प्रकारे नष्ट करणार नाही. तेव्हा एक तर ते धमकीचं पत्र नसावं किंवा तुम्ही उभे राहणार नसावेत. काय खरं आहे यातलं ?

उमाबाई : दुसरं खरं आहे. ते उभे राहणार नाहीत.

कर्नल : चूक. का ते सांगतो ना मी. मी निवडून आल्यावर हिला घेऊन अमेरिकेला जाणार आहे -- तिथे लोकशाही मूल्यांची कशी जोपासना चाललीय त्याचा अभ्यास करायला. मग काय प्रश्न येतोय ?

उमाबाई : हां -- असं असेल तर यांचं बरोबर आहे.

पुरोहित : काय भानगड काय ही ? तुम्ही काय फक्त अमेरिकेतल्या लोकशाही मूल्यांचा अभ्यास करायलाच उभे राहताय काय ?

देवरस : तसंच काही नाहीय ते अगदी. पण घरातली लोकशाही पाळण्यावरही यांची श्रध्दा आहे. आमच्या सारखंच.

पुरोहित : तुमचं काय ?

देवरस : आता मी पुस्तक लिहितोय ना ? मग ही छत्र्यांचा कारखाना काढणार.

कर्नल : बिनकाड्यांच्या छत्र्या !

पुरोहित : बिनकाड्यांच्या छत्र्या ? ही काय भानगड आहे ?

रमाबाई : नवीन प्रकारच्या छत्र्या आहेत या.

देवरस : मराठी रंगभूमीवर जेव्हा लिंगवाद आणि हिंसा यांचा सुळसुळाट वाढू लागला, तेव्हा ही बिनकाड्यांच्या छत्रीची कल्पना निघाली.

पुरोहित : म्हणजे अगदी सांस्कृतिक छत्रीच काढताय तुम्ही ! वा वा वा !अभिनंदन !

कर्नल : पण अजूनही -- म्हणजे ही सांस्कृतिक छत्री असली तरी -- अशी छत्री काही उघडता येईलसं वाटत नाही मला.

देवरस : म्हणजे कर्नल, तुमचं असं मत दिसतंय की, या छत्रीनं पावसापासून आपलं संरक्षण होण्याऐवजी, तिचंच आपल्याकडून पावसापासून संरक्षण होण्याची शक्यता आहे ! साध्या छत्रीचा उपयोग करून ! आणि ती खाकोटीला मारून ।

रमाबाई : इतकी काही अगदी टिंगल करायला नकोय. काढूनच दाखवीन मी अशी छत्री.

देवरस : रमा छत्री. आणि तुम्ही, कर्नल, खाकोटीला नव्हे, काखोटीला म्हणायचंय मला, लक्षात घ्या ।

पुरोहित : ( हसून -- ) मोठी मजेदार माणसं आहात तुम्ही. तुमच्या मनात असलेल्या गोष्टी जेव्हा प्रत्यक्षात येतील, तेव्हा हे जग आहे त्याहून खूपच सुंदर होईल.

देवरस : म्हणजे ही दोघं अमेरिकेला गेली की, की ... इथलं जग सुंदर होईल, असं म्हणताय का काय तुम्ही ?

पुरोहित : छे छे ! तसं नाही हं. तुम्ही चौघंही इतकी छान माणसं आहात की, जवळ जवळ म्हणजे खोटीच वाटता. विश्वासच बसत नाही.

देवरस : पुरोहित -- तुम्हाला पुरोहित म्हणू का दिनकरराव म्हणू ? आम्ही खोटी माणसं तुम्हाला खरं धरतोय, म्हणून !

पुरोहित : काहीही म्हणा --

देवरस : तर पुरोहित, तुम्ही मुळाशी जात नाही. विश्वास बसणं -- खरं वाटणं किंवा खोटं वाटणं याला काय महत्त्व आहे ? जे आहे ते आहे तसंच पाहण्यातच गंमत आहे.

रमाबाई : मग, आता इथं जो त्या येणाऱ्या दुसऱ्या दिनकर पुरोहितचा खून होईल, तो आहे तसा पाहणार काय तुम्ही ? गंमत म्हणून ?

उमाबाई : हे पुरोहित उगीचच आले मधेच. अचानक खुनाची भयानक छाया पसरलीय इथं.

देवरस : त्यामुळं छत्रीची सावलीच तकलुपी वाटतेय आणि मूलभूत विचारसुध्दा !. खून म्हटलं की, महत्त्वच संपतं बाकीच्या गोष्टींचं. काय हो पुरोहित, तुम्ही एखादा खून पाहिलाय का प्रत्यक्ष ?

पुरोहित : बरेच पाहिलेत.

कर्नल : मी रिटायर्ड कर्नल आहे. युध्दात माणसं मरताना पाहिलीयत मी. पण खुनाइतकं भयानक वाटत नाही ते.

पुरोहित : खूनही जरा सवय झाली की, वाटतात तितके भयानक वाटत नाहीत. आजचा खून टाळायचा प्रयत्न करणार आहोत आपण -- पण कदाचित तो पाह्यलाही मिळेल तुम्हाला --.

देवरस : जरा खरं बोलू का ?

पुरोहित : बोला की --

देवरस : कुठला कोण तो दिनकर पुरोहित -- तो इथं येणार -- त्याची माहिती तुम्हाला कळते -- तुम्हीही दिनकर पुरोहित -- वगैरे हे सगळं जे आहे ना त्या शुध्द थापा आहेत असं मला वाटतं. हे अजिबात खरं वाटत नाही.

पुरोहित : आता तुम्हीही मला खोटी माणसं वाटता -- पण तुम्ही खरोखरचे आहात की नाही ?

रमाबाई : आम्ही दोघी जातो बाहेर. असल्या भयंकर प्रसंगाची आम्हाला भीती वाटते.

पुरोहित : म्हणजे, याची बाहेर वाच्यता होऊन गर्दी जमणार. तसं होता कामा नये. इथून कुणीही बाहेर जायचं नाही.

कर्नल : समजा आम्ही निघालोच बाहेर तर काय कराल तुम्ही ?

पुरोहित : मी काहीही करणार नाही. पण हा एक माणुसकीचा प्रश्न आहे हे लक्षात घ्या तुम्ही. आणि यात तुम्हाला तसा कोणताही धोका नाही याची खात्री देतो मी. त्यातून तुम्ही ऐकलंच नाहीत तर, तो खून टाळणं अशक्य होईल,आणि ते वाईट होईल.

कर्नल : बरं, ठीक आहे. चला. थांबू या इथंच. उमा आणि रमाबाई -- घाबरायचं काही कारण नाही – बघू या काय होतंय ते -- इतकी माणसं आहोत आपण. आठ वाजत आलेत. फार फार तर अर्धा-पाऊण तास वाट पाहावी लागेल आपल्याला. काही घडलंच नाही तर, प्रकरण आपोआपच संपेल.

पुरोहित : प्रकरण आपोआप संपेल, अशी आशा करू नका तुम्ही. ते संपवावं लागेल. आणि इथंच आणि आपल्यालाच संपवावं लागेल. जास्तीत जास्त नऊ वाजायच्या आत. साडेआठ वाजायच्या आत दिनकर पुरोहित येणारच इथं. यात बदल होणार नाही. कृपया तो आला तरी घाबरू नका. सहज नेहमीसारखे राहा. तुमच्या सहकार्याची मी खात्री बाळगू का ?

देवरस : ठीक आहे. होऊन जाऊ द्या काय ते. फक्त मला एक सांगा -- घराला कुलूप लावून आम्ही बाहेर गेलो तरी, परत आल्यावर, आम्हाला घरात त्या दिनकर पुरोहितचा मुडदा दिसेल हे तुम्ही कशावरून सांगता ?

पुरोहित : तेही कळेल तुम्हाला.

कर्नल : बरं, ठीक आहे -- चला -- बसा. बघू या. ( बसतात.)

पुरोहित : आधीच आभार मानून ठेवतो मी आपले. बरं, मी जरा बाहेरची व्यवस्था बघून येतो. कृपया घाबरटपणानं काही वेगळंच वागू नका.

रमाबाई : आणि तुम्ही गेल्यावर तो आला तर ?

पुरोहित : तो आला की, एक मिनिटाच्या आत आहेच मी इथं. लगेच काही होणार नाही. जरा बोलत राहा काहीतरी. अं ? आलोच मी --

कर्नल : हं -- ठीक आहे -- या -- ( पुरोहित दारापर्यंत जातो.)

पुरोहित : दार फार तर पुढं करून घ्या तुम्ही -- आणि तो आत आल्यानंतर उघडंच ठेवा -- आलोच मी – ( जातो. रमाबाई जाऊन दार पुढे करून येतात. पडदा पडत जातो... )

**अंक पहिला समाप्त**

**अंक दुसरा**

( रमाबाई दार पुढे करून येतात. काही क्षण शांतता -- )

कर्नल : चाललं होतं काय आणि मधेच हे उपटलं काय बघा !

रमाबाई : नाही तर काय ? महत्त्वाचे सगळे विषय राहिले बाजूला !

कर्नल : देवरस, कधीकधी असं वाटतं की, कशाचा कशाशी संबंधच नाही --

देवरस : काही वेळी असंही होतं की, असंबध्द वाटत असलेल्या गोष्टी संबंधित असल्याचं कळतं नंतर. कधी कधी तर, सगळं एकच वाटतं नंतर -- सध्या मात्र आपण कसल्यातरी जाळ्यात सापडत चाललोय असं वाटतंय मला --

कर्नल : बघत राह्यचं झालं ! वस्तुत: या दिनकर पुरोहितचा आणि आपला काय संबंध !

उमाबाई : ज्या अर्थी हे सगळं इथं घडतंय, त्या अर्थी संबंध काहीतरी असेलच असं वाटतं मला -- नाही तर नेमकी याच घरात कशाला आली असती ही भानगड --

कर्नल: सारखं नशिबावर हवाला ठेवायचा आणि श्रध्देवर जगायचा कंटाळा आला आता --आपण स्वत: काहीतरी समजून घ्यायला पाहिजे -- स्वत:च काहीतरी करायला पाहिजे...

देवरस : आपण कसल्यातरी जाळ्यात सापडत चाललोय हे नक्की !

कर्नल : काय असेल ते असो -- नुसतं बघायचं आता --

उमाबाई : हे खरं असलं तर, एका माणसाचा जीव वाचला तर बरंच आहे.

रमाबाई : पण या पुरोहितपासूनही जरा सावध राह्यला पाहिजे आपण --

उमाबाई : अगदी खरं आहे. याचाच काही उद्देश असला तर ?

रमाबाई : एकूण आमच्या छत्र्यांचं मागं पडायचाच दिवस दिसतोय आज. आधी ते आठवत नसलेलं परीक्षण झालं -- आता हा खून ! -- माहीत नसलेल्या माणसाचा !

देवरस : माहीत असो -- नसो -- खून तो खून ! ते असो. कर्नल, तुम्हाला काय वाटतं ? हे सगळं खरं असेल ?

कर्नल : मी आता काहीही विचार करणार नाही. नुसतं बघणार काय काय होतंय ते.

रमाबाई : योगायोगानं ही दोघंही यावेळी इथं आहेत ते बरं आहे. नुसतं आपल्याला दोघांना कठीण गेलं असतं हे.

देवरस : -- हं.

कर्नल : मला वाटतं, आपल्या पध्दतीनं आपला वेळ चालला आहे, असं वातावरण ठेवणं आवश्यक आहे. हा आत्ताचा पुरोहित धोक्याचा असला तरीही, आपण सहज नेहमीसारखं राहणंच आवश्यक आहे. जवळजवळ आपण याला काहीच महत्त्व दिलेलं नाही असं वागायला पाहिजे. म्हणजे हाच खोटा असला तरी, आपण त्याचा खोटेपणा ओळखलाय असा त्याचा गैरसमज होणं शक्य होईल. आणि खरोखरच तो दुसरा दिनकर पुरोहित आला, तरी, आपल्याला काहीच माहिती नाही, असं आपल्याला दाखवणं सोपं जाईल.

देवरस : मग मी तुम्हाला आणखी काही कागद देतो. तुम्ही त्याचे चिटोरे करत बसा. नॉर्मल वाटायला ते दृश्य बरं आहे.

कर्नल : पण मलाही वेड्यासारखं वाटायला नकोय. दुसरं काही काढा.

देवरस : मग असं करू या. तुमचा लवकरच खून होणार आहे आणि हे तुम्हाला माहीत आहे, असं समजून मुलाखत घेतो मी तुमची. तुम्ही उत्तरं देत राहा.

कर्नल : नो नो नो. मूळ भयानक विषय सुटत नाही यात. त्यापेक्षा मी रमाबाईंना त्यांच्या नव्या छत्रीबद्दल प्रश्न विचारतो --

देवरस : आणि तुमचं होईपर्यंत मी आणि उमाबाईंनी काय करायचं ?

रमाबाई : दोघादोघांचं काही नको आत्ता. चौघांचं असं काहीतरी काढा.

देवरस : मग असं करू या. येत्या रविवारी आपल्याला कुठंतरी ट्रिपला जायचं आहे असं समजू या आणि

त्याच्यावर चर्चा करत बसू या.

उमाबाई : हं -- हे छान आहे.

रमाबाई : जायचं कुठं पण ट्रिपला ? ते नक्की ठरवा आधी.

कर्नल : सांगा की तुम्हीच. कुठंही सांगा. आपल्याला काही प्रत्यक्ष जायचं नाहीय.

देवरस : तरी खरं वाटण्यासाठी जवळचंच ठिकाण घ्या एखादं.

उमाबाई : मग नंदीच्या टेकडीला जाऊ.

कर्नल : ऑल राईट ! इथून दहाबारा किलोमीटर असेल ती टेकडी.

देवरस : मला वाटतं सकाळी साडेसातला एक एस.टी. आहे. आणि तिकडून परत यायला संध्याकाळी साडेसातला.

कर्नल : ( घड्याळ पाहात -- ) सव्वाआठ वाजत आले --

देवरस : विषय सोडू नका ... नंदी टेकडी.

कर्नल : तसं बऱ्याच दिवसांत आपण कुठं गेलेलोच नाही. दोन वर्षांपूर्वी आपण वीरभद्रा देवीला गेलो होतो.

रमाबाई : नंदी टेकडीवर उतरायची काय व्यवस्था आहे ?

कर्नल : मस्तपैकी गर्द, गार झाडी आहे. आणखी व्यवस्था करायचीय काय घेऊन ? जेवणाचे डबे घेऊन जायचं मस्तपैकी ! बास् ! संध्याकाळच्या एस.टी. नं परत !

उमाबाई : नंदी टेकडीपलिकडच्या टेकडीवर शंकराचं देऊळ आहे. नाही का हो ?

कर्नल : होय, पण ते दोन्ही एका दिवसात करता येत नाही म्हणतात...

रमाबाई : एका दिवसात केलं तर फार मोठं पुण्य आहे म्हणे !

कर्नल : पण हे दोन्ही एका दिवसात करायचा प्रयत्न करणाऱ्या अनेक लोकांना अडथळे आले असं म्हणतात. कुणाला अपघात झाले, कुणाची मुलंच एकदम आजारी झाली, कुणाचे जवळचे सगळे पैसेच गायब झाले -- अशा अनेक गोष्टी आहेत. आपण काही ती विषाची परीक्षा घ्यायची नाही. पुण्य मिळतंय म्हणून ही नसती आफत नको.

देवरस : तसलं काही नकोच ते. मजेत आपलं नंदी टेकडीवर जायचं आणि संध्याकाळी परत यायचं.

उमाबाई : निसर्गाच्या सान्निध्यात गेलं की, कसं बरं वाटतं !

रमाबाई : हल्ली बागही केलीय म्हणे वरती.

कर्नल : खरं म्हणजे अशा निसर्गरम्य ठिकाणी बागाबिगा करू नयेत, मूळचं नैसर्गिक सौंदर्यच चांगलं वाटतं.

रमाबाई : नाही तर काय ! निसर्गसान्निध्यात म्हणून जायचं आणि तिथंही आपलं कृत्रिम बागेत बसायचं म्हणजे नको वाटतं.

देवरस : निसर्गसान्निध्यातली बाग म्हणावी ती । इतकं मनावर कशाला घ्यायचं ?

रमाबाई : ते आहेच हो.

कर्नल : पण मूळचं सौंदर्य माणसं घाण करतातच, हे मात्र नक्की. आम्ही त्या ह्याला गेलो होतो बघा -- कोणार्कचं सूर्यमंदिर -- सगळीकडे भिकारी बसलेले नुसते -- भिकारीच भिकारी --

उमाबाई : सरकारनं खरं तर सगळे भिकारी हाकलून स्वच्छ ठेवला पाहिजे तो भाग.

देवरस : पण शिल्पकला बरी आहे म्हणतात तिथली.

कर्नल : ते आहे हो ! पण हे काय --! त्यापेक्षा मग उटी किंवा माथेरान ही निसर्गरम्य ठिकाणं चांगली बघा --

उमाबाई : सज्जनगडावर सुध्दा आपले दोन दिवस किती मस्त गेले की नाही.!

देवरस : कर्नल, नाही नाही म्हटलं तरी, बरंच फिरून झालंय की हो तुमचं !

रमाबाई : आता कुठल्याही क्षणी येऊ शकेल हं तो. आता मात्र अजिबात लक्ष नाही, असं राह्यला पाहिजे.

देवरस : तेच चाललंय की पण ! मधेमधे हे कशाला पाहिजे ! नुसती वर छत्री धरायला उपयोग आहे बघ तुझ्या डोक्याचा !

रमाबाई : बरं बरं ! असू दे !

उमाबाई : बरं, नक्की जायचं ना मग येत्या रविवारी ?

देवरस : जायचंच हो -- पण चांगली लिंक लागली होती नंदी टेकडीवरून -- ती तुटली की नाही ?

कर्नल : लिंक लागेल हो परत -- त्याचं काय एवढं ! रमाबाई, तुम्हीच जोडून द्या बरं पुन्हा.

रमाबाई : असं म्हटल्यावर मला नाही जमणार -- ते छत्रीच्या कारखान्याचं मी विचारल्यापासनं राग धरलाय त्यांनी माझा --

उमाबाई : बरं, देवरस मी देते लिंक लावून तुम्हाला ! मी सुरुवात करते, मग तुम्ही पाहिजे तिथे घ्या जोडून – अं --

देवरस : हं -- करा सुरुवात --

कर्नल : जरा एक मिनिट -- मला दार जरा वाजल्यासारखं वाटलं -- ( देवरस कपाळावर हात मारतात. कर्नल पाहून येतात.) कुणी नाही -- हं -- चालू द्या --

देवरस : नंदी टेकडीत खरंच सगळ्यांचं लक्ष आहे का -- नाहीतर मग सरळ आपलं त्या दिनकर --

कर्नल : शू च्! ते बंद ! ( उमाबाईंना --) हं --

उमाबाई : मी चपात्या आणि दहीभात घेते करून आणि रमाबाई तुम्ही भाजी, चटणी आणि एखादा वेगळा पदार्थ घ्या-

कर्नल : वेगळा पदार्थ वगैरे काही नको ! अशा ठिकाणी कसं -- भाजी, भाकरी, चटणी आणि कांदा असावा ! बस्स ! मजा येते !

रमाबाई : पण यांना भाकरी आवडत नाही ना !

कर्नल : आवडत नाही ? अगदीच अरसिक बुवा तुम्ही देवरस !

देवरस : भाकरी आवडत नसली तर, नंदी टेकडीवर जाऊ नये काय ?

उमाबाई : मला पण भाकरी आवडत नाही बाई !

कर्नल : बरं जाऊ दे ! चपात्या की भाकऱ्या ही अगदीच बिनमहत्त्वाची बाब आहे ! तिथं जाऊन एक दिवस घालवणं हे सगळ्यात महत्त्वाचं !

रमाबाई : की आपण नंदी टेकडीऐवजी अशोक तलावाला जायचं ?

देवरस : कशाला ? उड्या मारायला ? म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळी चार प्रेतं पाण्यावर !

कर्नल : देवरस, तुम्ही म्हणजे अगदीच हे बुवा -- नंदी टेकडीवरनं अशोक तलावाचा विषय काढला, तर अगदी तळाशी घेऊन जाता तुम्ही --

रमाबाई : मूलभूत विचारवाले ना ते ! आम्ही उथळ ! पण उथळ माणसंच जिवंत राहतात -- तळाशी जाणाऱ्यांची प्रेतं वर येतात --

कर्नल : कळत नकळत पुन्हा आपण प्रेताच्या विषयापाशीच घुटमळायला लागलोय ! दुसरा कुठलाच इंटरेस्टिंग विषय नाही काय जगात ?

रमाबाई : छत्र्यांच्या कारखान्याचं मी कसं प्लॅनिंग केलंय ते सांगू ?

देवरस : पुन्हा छत्र्यांचा विषय -- कुणीही काढला तर, घरात असलेली छत्री घेऊन पेकाटात घालीन मी !

कर्नल : हे काही मूलभूत विचाराचं लक्षण नव्हे ! मूलभूत विचार करणारे असे चिडत नाहीत.

देवरस : चिडणं हाच काही काही वेळा मुळावर हल्ला करायचा मार्ग असतो.

कर्नल : तुम्ही उगीचच गांभीर्य वाढवता बुवा. प्रसंगाचं गांभीर्य लक्षात घेऊन मजेत राहणं आवश्यक आहे आता.

रमाबाई : या पहिल्या दिनकर पुरोहिताचा काही तरी डाव दिसतोय . अजून कसा परत नाही आला तो ?

कर्नल : ( उठत -- ) बाहेरून कुणी आपलं बोलणं ऐकत नाही ना ? ( पाहून येतात --) नाही -- कुणीच नाही --

उमाबाई : खरं म्हणजे कुठलाही एक दिनकर पुरोहित लौकरात लौकर यावा अशी इच्छाच व्हायला लागलीय आपल्याला. दुसरं काहीतरी ढोंग करणं कठीण जातंय आपल्याला .

कर्नल : जरा, रेडिओ लावा हो देवरस -- ( देवरस उठतात. जाऊन रेडिओ चालू करतात -- रेडिओवर पुरुषाचा आवाज --' या पुस्तकाची एकूण मांडणी वगैरे ठीक असली तरी, आपल्या देशातली परिस्थिती विचारात घेऊन छत्र्यांचे उत्पादन छोट्या प्रमाणात करावे की मोठ्या, याचे विवेचन यात आलेले नाही -- ही या पुस्तकाची एक महत्त्वाची कमतरता आहे '. भाषण संपते.. रेडिओवर स्त्रीचा आवाज – " आत्ताच आपण ' छत्र्यांचे उत्पादन ' या पुस्तकाचे परीक्षण ऐकत होता. वक्ते होते श्री. उमाकांत पुरोहित. रात्रीचे साडेआठ वाजताहेत -- आता ऐका -- "-- देवरस रेडिओ बद् करतात. )

देवरस : सगळीकडे नुसती छत्र्यांची चर्चा चाललीय !

कर्नल : पण त्या बोलणाऱ्यांचं नाव ऐकलंत का तुम्ही ? श्री. उमाकांत पुरोहित !

रमाबाई : हाही मेला शेवटचं वाक्य महत्त्वाचं असल्यासारखा बोलला, पण निश्चित काहीच कळलं नाही. वैताग आहे नुसता. कपबशा पडल्यायत इथंच अजून -- ( कपबशा उचलतात. आत घेऊन जातात -- )

कर्नल : साडेआठ वाजून गेले -- सगळं खोटंच दिसतंय आता हे -- पण इट वॉज अ गुड ज्योक -- या सेन्सेशनचीही एक मजा आली – चला -- ( आत अचानक कपबशा पडल्याचा आवाज -- रमाबाई घाबऱ्या घाबऱ्या ओरडतात -- पळत बाहेर येतात -- बाहेरचे तिघेही एकदम सावध होतात.) आँ ? काय झालं ?

रमाबाई : स्वयंपाकघरात माणूस बसलाय एक ! डायनिंग टेबलाजवळच्या खुर्चीवरच बसलाय ! -- ( पुढे बोलवत नाही इतक्या घाबरलेल्या --)

कर्नल : आत माणूस ?-- बघू -- ( कर्नल पुढे येतात -- मागोमाग देवरस दारापर्यंत जातात.) कोण आहे ?

देवरस : ( मागूनच -- ) कोण आहे ? ( इकडे रमाबाई आणि उमाबाई घाबरून उभ्या -- )

कर्नल : ( दरडावणीच्या आवाजात -- ) कोण आहे ?

देवरस : ( पहिल्याप्रमाणेच -- ) कोण आहे ?

कर्नल : माणूस तर बसलेला दिसतोय खुर्चीत --

देवरस : कोण आहे ?

कर्नल : थांबा, काठी आहे का एखादी --

रमाबाई : काठी आतच आहे --

कर्नल : थांबा, मी बघतो आत जाऊन --

उमाबाई : थांबा. एकदम आत नका जाऊ. धडाधड उठून गोळ्याबिळ्या झाडल्यान् म्हणजे ?

कर्नल : ( हळू आवाजात -- ) देवरस, इकडे या असे -- ( आणखी हळू आवाजात--) तुम्ही तिघेही थांबा इथे -- मी जमिनीवरून सरपटत एकदम आत जातो -- आणि बघतो --

देवरस : की सरळ आपण दाराला कुलूप लावून बाहेर जाऊ या ?

कर्नल : आणि ?--

देवरस : पोलिसांना कळवू या --

कर्नल : थांबा जरा -- बघू या -- आत माणूस बसलाय -- आपण घरात असताना -- म्हणजे नीट बघायला पाहिजे -- एकदम पोलिस नको -- हं -- तुम्ही थांबा इथंच..( दोनतीन क्षण अत्यंत तीव्र शांतता... मग कर्नल पावले न वाजवता पुढे होतात.. दारापर्यंत जातात.. मग अचानक वाकून जमिनीवरून सरपटत क्षणात आत जातात.. तिघेही दगडासारखे उभे ...)

देवरस : .. अं... अजून कर्नल आतच कसे ? .. मी बघू काय जाऊन ?

उमाबाई : बघा की जरा पुढे होऊन -- ( देवरस एकेक पाऊल टाकत पुढे जायला लागतात तेवढ्यात आतून कर्नल येतात. त्यांना हाताच्या कोपराजवळ लागलेले असून रक्त येत आहे ...)

देवरस : काय झालं हो ? झटापट बिटापट झाली काय ?

कर्नल : नाही. प्रेत आहे ते. हाताला कपबशीचा फुटलेला तुकडा लागला माझ्या.

रमाबाई : हं -- मघाशी कपबशा पडल्या माझ्या हातून त्या फुटल्या असणार --

देवरस : ते असो. प्रेत आहे म्हणता ? काही विशेष लागलेलं नाही नं हाताला ?

कर्नल : नथिंग -- हे किरकोळ आहे. ( हाताकडे दुर्लक्ष --) प्रेत आहे ते. नंतर दिवा लावून बघितलं मी. कपडे फक्त वेगळे आहेत. पण माणूस तोच वाटतोय मला.

देवरस : कोण ? दिनकर पुरोहित ?

कर्नल : हं -- पहिलाच -- म्हणजे आपल्याशी जरा वेळ बोलून गेला .. तोच --

उषाबाई : हे कसं शक्य आहे ? तो तर बाहेर गेला आपल्या समोरच -- आत एकदम त्याचं प्रेत --

रमाबाई : त्याच्यासारखा दिसत असेल हा. पण, तो येणार होता, तोच असेल हा --

उमाबाई : बाप रे !

रमाबाई : आता काय करायचं ?

देवरस : पण दुसरा असला तरी, आत एकदम प्रेत आलं कुठून ? आणि पहिला कुठं गेला ?

कर्नल : आता पहिला की दुसरा करत बसून उपयोग नाही -- आत प्रेत आहे हे नक्की -- दाराला कडी लावू या आतून -- ( कडी लावायला दाराकडे जाऊ लागतात --)

देवरस : थांबा, त्यापेक्षा आपण सगळेच बाहेर जाऊ आणि कुलूप घालू बाहेरून --

कर्नल : आणि ?

देवरस : पोलिसांना कळवू --

कर्नल : जरा थांबा. गडबड करू नका.. हा तो पहिलाच असला तर, पोलिसांचाच माणूस ! आपण घरात असताना याचा खून झालाच कसा हा प्रश्न येणारच -- ( दाराला आतून कडी घालून येत --) वाट पाहू या एक दहा मिनिटं -- पहिला पुरोहित आलाच परत, तर आपोआपच सोपं होईल --

देवरस : म्हणजे खून झालाच म्हणायचा शेवटी !

कर्नल : होय. प्रेत आहे आत.

रमाबाई : ई ऽ ग बाई ! स्वयंपाकघरात जेवायच्या ठिकाणी प्रेत ! ( अंगावर शहारे. )

उमाबाई : खरंच प्रेत आहे का आत ?

कर्नल : थांबा -- ( आत जातात. काही क्षणांनी ते प्रेत ओढून बाहेर आणतात -- दोघी बायका दचकतात -- घाबरतात -- लांब होतात --)

देवरस : असू दे -- ठेवा तिथंच -- हं -- राहू दे तिथंच कडेला -- ( बायका अत्यंत घाबरलेल्या -- अस्फुट आवाज

-- देवरस थोडे थोडे पुढे होतात -- वाकून पाहतात – मग -- ) चेहरा तर तोच दिसतोय -- पण कपडे वेगळे कसे ? का हा त्याच्यासारखाच दिसणारा आहे म्हणायचं ?

कर्नल : कोण ?

देवरस : हाच हो --

कर्नल : हाच ते झालं । पण हा एखादा तिसराही कुणी असू शकेल -- त्याच्यासारखा दिसणारा --

देवरस : म्हणजे दुसऱ्यासारखा ?

कर्नल : दुसऱ्यासारखा कसं म्हणता येईल ! त्याला पाहिलंय का आपण ?

रमाबाई : नाहीतर .. नाहीतर.. तो पहिला आलेलाच खरा दुसरा असेल ..आणि.. पहिला आलाच नसेल अजून ..

देवरस : आपण पुरते अडकलो यात ! छे ! ( पुन्हा पुढे होतात. वाकून पाहतात. आता बायकाही जरा भीती चेपून पुढे येतात -- पाहतात -- )

रमाबाई : ( दचकून मागे होत --) बाप रे ! डोळे उघडे आहेत त्याचे !

कर्नल : ( प्रेताजवळ जाऊन प्रेताचे डोळे मिटवून --) हं -- मिटवले डोळे --

देवरस : भयंकर आहे ! असं नकोच हे -- हे असं आपल्या आपल्यात नको --

कर्नल : आता घाबरून, गडबड करून काही उपयोग नाही -- जरा एक दहा मिनिटं थांबू फक्त -- तुम्ही बायका बाहेर जा फार तर -- लगेच बोलणार नसाल कुठे तर --

उमाबाई : नाही नाही -- आम्ही तुम्हाला इथं सोडून नाही जाणार --

कर्नल : स्वस्थ बसा मग --

देवरस : आपण अगदी पुरते अडकलो यात !

कर्नल : माझ्या अंदाजाप्रमाणे हा खून आपणच केला असा आरोप होण्याची शक्यता आहे -- तर -- ( इथे अचानक रमाबाईंना चक्कर येते आणि त्या बेशुध्द होऊन पडतात -- उमाबाई त्यांना धरतात -- कर्नल आणि देवरस लक्ष जाताच ‘ अरे अरे ’ म्हणत पुढे येतात -- रमाबाईंना जमिनीवर झोपवतात -- कर्नल घाईने आत जाऊन पाणी घेऊन येतात. गडबडीत पुन्हा पायाला काच लागलेली आहे. जरा लंगडतच येतात -- रमाबाईंच्या तोंडावर पाणी शिंपडतात -- उमाबाई घाईने वर्तमानपत्र घेतात -- वारा घालतात -- देवरस ,’ रमा, ए रमा --’ करत त्यांच्याजवळ अधीरपणे बसून... काही क्षणांनी रमाबाई शुध्दीवर येतात .. डोळे किलकिले उघडत इकडे तिकडे पाहतात...)

देवरस : हं, कसं वाटतंय आता ? -- अं ? -- ए रमा --

रमाबाई : छत्र्यांचा कारखाना .. छत्र्यांचा कारखाना...बिनकाड्यांच्या...

देवरस : ( घाईने -- ) काढू या, काढू या ! शांत हो तू आधी --

रमाबाई: : ( इकडे तिकडे पाहून एकदम लक्षात येऊन --) खू ऽ ऽ न !...( पुन्हा बेशुध्द पडतात..पुन्हा पाणी -- वारा .इ...)

देवरस : रमा, रमा -- छत्र्यांचा कारखाना काढायचा नं आपण ? -- ए रमा, -- रमा -- चला,छत्र्यांचा कारखाना काढू या आपण -- ए रमा -- बिनकाड्यांच्या छत्र्या – अं -- ए ऽ --

रमाबाई : ( पुन्हा शुध्दीवर येत --) छत्र्या नं ! हं ! काढायच्या...काढायच्याच...

उमाबाई : ( रमाबाईंना उठवून खुर्चीकडे नेत --) हं बसा बघू इथं तुम्ही -- स्वस्थ पडा जरा डोळे मिटून --

देवरस : रमा --

कर्नल : देवरस, त्याना डिस्टर्ब करू नका -- बसू देत स्वस्थ -- ( रमाबाई खुर्चीवर बसतात.. डोळे मिटून रिलॅक्स होतात.. काही क्षण शांतता ..)

देवरस : ( जणू स्वत:शी -- ) हे छत्र्यांचं एक कठीण होऊन बसलंय ! ( मान झटकतात. )

उमाबाई : मी आतल्या काचा काढून येते आधी. यांना सारख्या जखमा होतायत...(आत जातात, जाताना प्रेतापासून शक्यतो लांबून जातात.)

कर्नल : मला वाटतं या खुनाची आपल्यावर जबाबदारी येणारच. हा खून आपल्याला न कळत झालेला असला तरी.

देवरस : ( कर्नल लंगडताहेत ते पाहून -- ) तुमच्या पायालाही लागलंय वाटतं -- औषध देऊ लावायला ?

कर्नल : औषधाचं नंतर बघू -- आधी हे खुनाचं महत्त्वाचं आहे.

देवरस : खरंच पूर्णपणे मेलाय का तो ? थोडी धुगधुगी असली तर वाचवायचा प्रयत्न करता येईल --

कर्नल : त्याच्या अंगावर जखम कुठंही दिसत नाहीय -- पण तो मेलाय हे नक्की -- पुन्हा बघू या आपण. या -- ( दोघंही पुढे होतात. कर्नल प्रेताच्या हाताची नाडी, छाती पाहतात. नाकासमोर हात धरून पाहतात. उमाबाई येतात, ते दोघं उठतात.)

उमाबाई : पुन्हा काय करताय प्रेताजवळ बसून ?

कर्नल : तो मेलाय हे नक्की. त्याला गळा दाबून मारलं असावं.

देवरस : बापरे ! आणि आपण इथं असताना हे सगळं घडलं !

कर्नल : उमा, तू आता रमाबाईंना घेऊन आपल्या घरी जा -- नंतर आम्ही बघतो काय ते --

रमाबाई : ( डोळे मिटून पडल्यापडल्याच --).. नाही.. हे त्या खुनातून सुटल्याशिवाय मी कुठेही जाणार नाही... ( रमाबाई ऐकत असतील हे तिघांनाही अनपेक्षित.)

उमाबाई : बरं राहू दे -- बसू आपणही इथंच -- स्वस्थ राहा तुम्ही -- ( कर्नलना --) रुमाल तरी बांधा तुम्ही पायाला--

कर्नल : काही नाही. ते असू दे. थांबलंय रक्त आता. मुख्य म्हणजे बिनबोभाट या प्रेताची विल्हेवाट लावता येतीय का ते बघायला पाहिजे --

देवरस : कर्नल, ही लपवाछपवी आपल्याला जमणार नाही -- आणि असा प्रयत्न करणं म्हणजे गुन्हा कबूल करण्यासारखं होणार ते. त्यापेक्षा आपणहून कळवून टाकू पोलिसांना --

कर्नल : काय सांगणार ?

देवरस : जे घडलं प्रत्यक्षात, तेच सांगायचं. आम्ही असं असं बोलत होतो. एक दिनकर पुरोहित म्हणून आला. तो पोलिसातला होता -- आणि तो गेल्यावर जरा वेळानं अचानक आम्हाला घरात हे प्रेत असल्याचं लक्षात आलं -- हेच ते प्रेत --

कर्नल : पोलिसांचं जाऊ द्या -- एखादं शेंबडं पोर तरी विश्वास ठेवू शकेल का याच्यावर ? विचार करा जरा.

देवरस : मी काय म्हणतो, आपला संशय आला तरी चालेल -- किंबहुना आरोप आला तरी चालेल. पण ही लपवाछपवी नको -- गुन्हेगारी वाटते त्यात -- आपणहून आरोप ओढवून घेतल्यासारखं होणार हे --

कर्नल : ते बरोबर आहे हो -- पण तुमच्या म्हणण्याप्रमाणे वागायचं म्हणजे, आयुष्य संपलंच आमचं -- कधीच उभं राहता येणार नाही मग मला -- अहो, माझ्यावर खुनाचा आरोप होता म्हटल्यावर कोण कुत्रं तरी मत टाकेल का मला ? -- म्हणून म्हणतोय -- एक पंधरा मिनिटं वाट बघू जरा. आलाच तो पहिला पुरोहित परत, तर त्याला सगळं सांगू -- त्याच्या गळ्यात अडकवून टाकू आणि मोकळे होऊ -- गडबड नको.

उमाबाई : म्हणजे अजूनही उभं राह्यचा विचार आहेच तुमचा ! हटवादीपणाची कमाल झाली ! पण अमेरिकेबद्दल एका शब्दानं तरी बोलतायत का बघा !

कर्नल : हे बघ, तिथल्या लोकशाही मूल्यांच्या जोपासनेचा अभ्यास करायला जायचं म्हणजे जायचं ! तिथल्या तुझ्या मैत्रिणीला हवं तितकं भेटून घे मग तू -- तुझं पूर्ण भेटून झाल्यानंतरच अभ्यास पूर्ण करून आपण परत यायचं --

देवरस : मी काय तुरुंगात बसून निवांतपणे माझं पुस्तक लिहू शकेन -- नाहीतरी ‘ गीता रहस्य ’ तुरुंगातच लिहून झालंय --

कर्नल : ( जरा चिडून -- ) तुम्हाला तुरुंगातल्या निवांतपणाची एवढी हौस असली तर, गुन्हा कबूल करा की मग तुम्हीच ! तुम्हीच हा खून केलाय म्हणून कबूल करा ! म्हणजे सगळेच सुटतील यातून !

देवरस : तसं नाही हो -- एक आपलं सांगितलं --

रमाबाई : ( पडल्यापडल्या -- ) तुरुंगात जायला निघालेत त्या मेल्या पुस्तकासाठी ! पण छत्र्यांचा कारखाना काढू या, असं काही येत नाही तोंडातून --

उमाबाई : देवरस, तुम्ही कबूल करून टाका की एकदा.

देवरस : काय ते ?

उमाबाई : छत्र्यांचा कारखाना काढू या म्हणून !

देवरस : काय कबूल करायचं आणि काय नाही, याच्यावर विचार केला पाहिजे मला -- आपल्या देशातली परिस्थिती विचारात घ्यायला पाहिजेच.

कर्नल : म्हणूनच म्हणतोय -- एक पाचदहा मिनिटं थांबू या आपण -- गडबड नको --

देवरस : मला स्वत:हून खुनाचा ठपका घेऊन तुरुंगात जायचं नाही -- पण अन्यायानं आलाच असा ठपका आणि गेलोच तुरुंगात, तर मला त्या संधीचा उपयोग होईल, इतकंच मला म्हणायचं होतं --

रमाबाई : ( पडल्यापडल्याच -- ) हे तुरुंगात गेले तर, मी एकटी बाहेर राहून काय करू ?

देवरस : ही आहे तर जागी -- ऐकतीय तर सगळं -- पण मग डोळे उघडून मिसळतीय का बघा आपल्यात --

उमाबाई : अहो, ते प्रेत बघवत नसेल त्यांना !

देवरस : कर्नल उभे राहणार आणि तुम्ही अमेरिकेलाही जाणार -- मग आमच्याबद्दल सहानुभूती दाखवायला काय जातंय तुमचं !

रमाबाई : ( पडल्यापडल्याच -- ) ते प्रेत बाहेर काढा आधी ! आपल्या घरात नको ते ! ( देवरस आणि कर्नल थक्क आणि दिङ्मूढ झाल्यासारखे उभे. )

उमाबाई : काढू या हं बाहेर -- काढू या --

रमाबाई : काढलं की सांगा मला -- म्हणजे डोळे उघडता येतील मला --

उमाबाई : सांगू या हं -- सांगू या -- स्वस्थ राहा बरं तुम्ही --

देवरस : प्रेत बाहेर काढा म्हणे ! तो काय जिवंत माणूस आहे, बाहेर काढायला !

रमाबाई : ( पडल्यापडल्याच -- ) काय म्हणताहेत हे ?

उमाबाई : काढू या म्हणताहेत बाहेर -- प्रेत !

देवरस : बरं कर्नल, समजा, विल्हेवाट लावायची म्हटलं या प्रेताची, तरी काय करता येईल ? मला तर काही शक्यता वाटत नाही अशी -- आणि असं घरात प्रेत ठेवून किती थांबता येईल आपल्याला ? -- थोड्याच दिवसांत सडून वास यायला लागेल – असह्य होईल.

कर्नल : ते बघतो मी --

देवरस : शेवटी काय आहे की, उभं राह्यचंय ते तुम्हाला ! तुम्हालाच या प्रेताची विल्हेवाट लावायची खरी गरज आहे !

रमाबाई : ( पडूनच -- ) असं म्हणू नका -- आपल्यालाही छत्र्यांचा कारखाना काढायचा आहेच नं --

कर्नल : पोतं आहे का एखादं ?

देवरस : म्हणजे या प्रेताची विल्हेवाट लावण्यात माझं साहाय्य घेणार तुम्ही !

कर्नल : नसेल साहाय्य करायचं तर पडू द्या ! आम्ही जातो घरी -- तुमचं तुम्ही बघून घ्या --

देवरस : असं कसं ? खुनाच्या वेळी तुम्हीही हजर होताच -- आणि आपण हे प्रेत पोत्यात भरत असतानाच दिनकर पुरोहित आला म्हणजे ?

कर्नल : तो येणार नाही -- हा तोच आहे --

देवरस : कोण ?

कर्नल : उगीच गोंधळून जाऊ नका -- शांतपणे आटपायला पाहिजे पटापट --

देवरस : मला हे असलं जमायचं नाही --

कर्नल : अहो, नुसतं पोतं कुठं आहे ते सांगाल की नाही ?

देवरस : घरात नाहीय पोतं -- आणायला पाहिजे बाजारातून आणि दुकानंही बंद झाली असतील आता --

कर्नल : अहो, अशा वेळी दुकानं उघडी आहेत की नाही हे काय बघत बसताय ! कुठूनही पैदा केलंच पाहिजे पोतं !

उमाबाई : रमाबाईंच्या एखाद्या जुन्या साडीत बांधलं तर ?

रमाबाई : ( पडूनच -- ) नको -- माझ्या साडीत नको प्रेत -- !

देवरस : याचे कपडे वेगळे असल्यामुळं जरा प्रश्न निर्माण झालाय ! नाहीतर हा तोच आहे हे निश्चित कळलं असतं आपल्याला !

कर्नल : कोण ?

देवरस : कोण कोण काय करताय ? उगीचच गोंधळ नुसता !

कर्नल : तुम्ही काहीच सहकार्य देणार नसाल, तर माझाही नाइलाज होईल -- नंतर मग दोष देऊ नका मला --

देवरस : बरं, माझं एक पीतांबर आहे ते देऊ का ?

कर्नल : पीतांबर ?

देवरस : हं ! --

कर्नल : पीतांबरात प्रेत ! कसं शक्य आहे ! --

देवरस : प्रेताला पवित्र पीतांबर पांघरणं -- मलाही कसंसंच वाटतंय ते ! -- पण तुम्ही हट्टालाच पेटल्यावर काय करणार ।--

कर्नल : बरं द्या -- पीतांबर तर पीतांबर -- ( देवरस उठतात. रमाबाई काही बोलतात की काय ते पाहतात, मग पीतांबर आणायला आत जातात -- कर्नल उभे --)

उमाबाई : इतकं काय छळताय त्यांना ? पीतांबर कशाला मागितलंत त्यांचं ? ( कर्नल नुसता एक कटाक्ष टाकतात -- देवरस पीतांबर न आणताच परत येतात --)

देवरस : पीतांबर नको ! बरोबर वाटत नाही ते ! सरळ चादर देतो एखादी -- आधीच सुचायला हवं होतं हे --

कर्नल : बरं द्या -- चादर द्या --

रमाबाई : ( डोळे मिटूनच-- ) अहो,पण जुन्या चादरी वर बांधून ठेवल्यायत मी -- खाली फक्त नव्या चादरी आहेत --

कर्नल : ( चिडून रमाबाईंकडे पाहात --) असू द्या हो नवी चादर -- मी देतो शंभर रुपये उद्या -- आणा हो देवरस -- आणि लौकर घ्या -- बी क्विक ! --

देपरस : ( रमाबाईकडे जरा वेळ पाहात उभे, मग -- ) देऊ का ग नवी चादर !

रमाबाई : हं --

देवरस : ( उमाबाईना -- ) ' हं ' म्हणाली, की ' अं हं ' म्हणाली ती ?

उमाबाई : ' हं ' म्हणाल्या --

रमाबाई : द्या -- ( देवरस जातात आणि नवी चादर घेऊन येतात -- सिंगल बेडशीट --)

देवरस : ( कर्नलना --) हं, घ्या --

कर्नल : ( चादर पाहून --) अहो देवरस, प्रेत असं बांधायचंय की त्याचा अंगठासुध्दा बाहेर राहता कामा नये – या तुकड्यात बांधायचं म्हणजे कमरेखालचं सगळं बाहेर राहील त्याचं -- ( अस्वस्थपणे -- ) छया ! कठीण आहे बुवा ! घ्या -- ते पीतांबरच घ्या तुमचं ! फार  तर परत आणून देतो तुम्हाला --

देवरस : ( रमाबाईकडे पाहून -- ) देऊ का ग पीतांबर ?

रमाबाई : नको -- ( जरा वेळानं ) चादरीचं काय झालं ? ( देवरस उभे. कर्नल वैतागून खुर्चीवर बसतात. अस्वस्थ,.चिडलेले. )

कर्नल : ( उमाबाईना --) तू ताबडतोब आपल्या घरी जा -- आणि एक पाच दहा चादरी -- माझा रेनकोट – दोनचार साड्या -- दोनचार पोती घेऊन ये -- जा --

उमाबाई : अहो इतकं कसं उचलता येईल मला ? आणि एकच प्रेत टाकायचं आहे ना ?

कर्नल : बरं जा -- जमेल ते घेऊन ये -- जा -- जा -- ताबडतोब --

रमाबाई : ( पडूनच शांतपणे -- ) नको -- उमाबाईंना थांबू द्या इथं -- त्या गेल्या तर ओरडेन मी -- ( यावर कर्नल कपाळ बडवून घेतात -- उमाबाई बघत उभ्या, देवरसही उभे -- काही क्षण -- कर्नल उठून भराभरा येरझाऱ्या घालायला लागतात -- )

कर्नल : ( एकदम मध्येच थांबून -- ) बरं देवरस, दोन चादरी द्या -- शिवाय तुमचे जुने शर्ट, पायजमे, पँटस, बनियन्स काढा लौकर -- चला --

रमाबाई : ( पडूनच -- ) इतके कशाला काढताय ? बोहारी आहे का तो ?

कर्नल : बरं, काढायचे तेवढे काढा -- चला -- निदान दुसरी चादर तरी घ्या लौकर -- ( देवरस जागचे न हलता स्वस्थ. ) अहो, हला. उभे का ! उभे का तुम्ही असे ?

देवरस : मला पटतच नाही हे --

कर्नल : ( जरा वेळ पाहून -- वैतागून झटक्यात निघत -- ) मीच जातो आणि घेऊन येतो – ( दारापर्यंत गेलेले--)

देवरस : थांबा -- (कर्नल थांबतात -- ) तुम्ही गेलात की, आम्ही आमच्या विचाराप्रमाणे करणार -- सरळ तिघंही बाहेर पडणार आम्ही आणि कुलूप घालणार बाहेरून -- ( कर्नल पाहात उभे --)  आणि पोलिसांना कळवणार --

कर्नल : म्हणजे पोलीस येतायत तोपर्यंत मी पोती घेऊन हजर होणार इथं ! ( कपाळ बडवत परत येतात. ) देवरस, असं वाटतंय की खून करावा तुमचा !

रमाबाई : कर्नल बरेच रागावलेत वाटतं --

कर्नल : पण दोन प्रेतं म्हणजे जड जाईल ते. अशक्यच होईल --

उमाबाई : ( कर्नलच्या जवळ येत-- ) तुम्ही शांत बसा बघू जरा -- उगीच काय इतकं -- स्वस्थ बसू या जरा – सुचेल काहीतरी --

कर्नल अग, त्यांना त्याचं महत्त्व वाटायचं कारणच नाहीय काही. तुरुंगात बसून उभं राहता येईल का मला ?

उमाबाई : असू दे -- स्वस्थ राहा जरा --

कर्नल : ( जरा वेळाने, समजुतीने देवरसांना --) बरं देवरस, म्हणणं तरी काय तुमचं ? एक शेवटचं सांगा बरं.

देवरस : बाहेर जायचं -- कुलूप घालायचं आणि पोलिसांना कळवायचं -- बास !

कर्नल : ( काकुळतीने --) अहो पण आम्हालाही जरा उभं राहता येईल असं पाहा की --

रमाबाई : ( डोळे मिटूनच -- ) उभं राहता येईल कर्नल तुम्हाला -- इतकं का अगदी लागलंय पायाला --

कर्नल : ( जवळजवळ रडतच -- ) ऑल माय लाईफ इज वेस्टेड ! -- ऑल माय लाईफ इज वेस्टेड !...राह्यलंच काय आता..

देवरस : तुमच्या आयुष्याचंच काय घेऊन बसलाय तुम्ही कर्नल -- त्या माणसाचा खून झालाय ते बघा की -- ( कर्नल काही बोलत नाहीत. देवरस बसतात. काही क्षण असेच. )

देवरस : ( जरा वेळाने -- ) मी काय म्हणतो कर्नल, आम्हाला जे योग्य वाटतंय ते तुम्ही करू देत नाही आहात आणि तुम्हाला जे करायचं आहे ते आमच्यामुळं तुम्हाला करता येत नाहीय -- मग आता नुसते बसून राहू या -- हे प्रेत जसं आपोआप आलं, तसंच आपोआप काय घडेल ते घडेल -- वाट पाहू या – ( कर्नल नुसती मान हलवत राहतात -- आवाज नाही --) किती लागेल तो लागेल वेळ --

रमाबाई : ( पडूनच -- ) मग उद्या छत्रीच्या कापडाच्या गाठींची ऑर्डर द्यायची नं ? --

उमाबाई : त्या तरी आधी आणून ठेवल्या असल्या तर उपयोग झाला असता आज --

देवरस : की पुन्हा गप्पा मारत बसू या आपण ? नंदी टेकडीबद्दल ? ( कर्नल नुसतं डोकं झटकत राहतात. आवाज नाही....)

उमाबाई : ( कर्नलना --) तुम्ही मनस्ताप करून घेत बसू नका आता उगीचच -- शांत व्हा बरं -- आणि देवरस, तुम्हीही बोलू नका आता -- ( सगळे गप्प, काही क्षण ..)

रमाबाई : ( डोळे मिटूनच --) बाहेर गेलात की काय सगळे ? बोलत कसं नाही कुणीच ?

उमाबाई : नाही. आहोत आम्ही इथंच. शांत राहा तुम्ही. काळजी करू नका .. अजून काही तो आला नाही .. त्या अर्थी हा तोच असणार ...

रमाबाई : ( पडूनच -- ) कोण ?

कर्नल : ( उठून उभे राहून --) च्यायला, मरू दे ते प्रेत ! तुमच्यासारखी माणसं असल्यावर काय होणार दुसरं ! मरू दे ! ( म्हणत बसतात. ) आपल्याला असं काहीही करता येणार नाही. आपोआप होईल ते होईल --

देवरस : मी बोललो तेच बोलताय तुम्ही -- पण स्वत:चं काहीतरी वेगळं असल्यासारखं बोललात --

कर्नल : हं ऽ ऽ असू दे -- बसू या स्वस्थ -- ( एक खुर्ची रमाबाईंच्या खुर्चीजवळ नेऊन तीवर बसतात. )

देवरस : हे बरं झालं पण ! मतभेदच संपल्यामुळं, सगळ्यांच्याच मतांना किंमत आली !

कर्नल : होय -- पण त्या प्रेतात आणि आपल्यात काय फरक राहिलाय आता -- खून न करता खुनाचे परिणाम भोगावे लागतील या भीतीनं, आत्महत्या न करता आत्महत्येचे परिणाम भोगायला लागलोय आपण --

देवरस : लष्करातनं रिटायर झालेल्या माणसाला तरी असलं विचारप्रवर्तक बोलणं शोभत नाही -- आम्ही पुस्तकं ल्याह्यची तरी कुणासाठी मग ?

कर्नल : काहीही न करता, तुम्ही आपणच सगळ्या गोष्टींचे चालक असल्यासारखं दाखवताय -- साधं घरात प्रेत सापडलं तर काय करावं ते समजत नाही तुम्हाला --

देवरस : तुम्हाला समजतंय -- पण माझ्यासारख्या क्षुल्लक माणसावरही तुम्हाला मात करता येत नाहीय -- कुणी लष्करात भरती करून घेतलं तुम्हाला ते बघायलाच पाहिजे एकदा --

कर्नल : ( काही क्षणांनी उठून तावातावाने प्रेताकडे जात -- ) हे असं फार वेळ बसता यायचं नाही मला – काहीही झालं तरी आय ॲम अ मॅन ऑफ ॲक्शन -- ( प्रेताला दाराकडे ओढू लागत --) बाहेर टाकून देतो हे प्रेत मी. काय व्हायचं ते होऊ दे --

देवरस : ( एकदा बघून, पण जागचे न हलता --) मग आम्ही जे म्हणत होतो, की आपण सगळे बाहेर जाऊन कुलूप लावू या, ते काय वाईट होतं ?

कर्नल : वाईट असो -- चांगलं असो -- असंच करणार मी -- मरू दे --

उमाबाई : ( उठून पुढे येत कर्नलना --) अहो, असं काय करताय ? दारापुढे जर प्रेत टाकून दिलं आपण, तर गवगवा नाही का होणार ?

कर्नल : होऊ दे ! तू गप्प बस ! ( प्रेत ओढण्यासाठी उचलू लागतात -- एवढ्यात बाहेरून आवाज : ‘‘ पोतं घ्या पोतं ! पोतं पाहिजे का पोतं ? पोतं घ्या हो ऽ पोतं ! ’’-- कर्नल चकित होऊन ऐकतात. इतरांकडे पाहतात. उमाबाईंना -- ) काय विकायला आलंय ?

उमाबाई : मला पण आश्चर्यच वाटतंय ! देवरस, तुम्हाला पण तेच ऐकायला आलं का हो ?

देवरस : एक माणूस पोतं विकायला आलाय असं ऐकू आलं मला. कमाल आहे ! पोतं कसं कोण विकायला येईल ?

उमाबाई : तेच म्हणते मी -- मला पण तसंच ऐकू आलं !

कर्नल : ( डोळ्यांत चमक -- ) आ ऽ यला ! ( आनंद -- ) पोऽतं ! मलाही तेच ऐकू आलं ! पो ऽ तं ! ( पुन्हा बाहेरून --‘ पोतं पाहिजे का पोतं ? पोतं घ्या पोतं --‘ कर्नल अत्यानंदाने दाराकडे जाऊ लागतात --)

देवरस : थांबा कर्नल ! पोतं विकत घ्यायचा विचार आहे की काय तुमचा ? विचार करा.

कर्नल : अबे हट् ! आयला, आयतं चालून आलंय पोतं दाराशी -- या पोत्यानं आपले हात पुसून टाकता आले नाहीत, तर आपल्यासारखे करंटे आपणच.

देवरस : विचार करा ! कर्नल, विचार करा ! ( कर्नल दार उघडतात. मागोमाग उमाबाई जातात.)

उमाबाई : अहो थांबा जरा, देवरस काय म्हणतायत ते तरी बघा.

कर्नल : थांब तू ! ( उमाबाईंना मागे सारून -- ) अहो, पोतंवाले -- हां हां, इकडे, इकडे या ! हां, या, इकडून या !

उमाबाई : नुसता उतावळा स्वभाव आहे तुमचा ! निवडणुकीला उभं राहणं असो, की पोतं विकत घेणं असो ! ( प्रेताकडे लक्ष जाऊन --) अहो, हे प्रेत तरी लपवायला हवं होतं -- ( दरम्यान पोतेवाला येतो. )

पोतंवाला : हं काय साहेब,पोतं घ्यायचं का ? फस्टक्लास पोतं !-- यातनं मुडदा टाकला तरी कळायचं नाही कुणाला ! ( यावर कर्नल जरा दचकून उडतात, पण लगेच नॉर्मल होतात. उमाबाई प्रेतासमोर उभ्या राहून पोतंवाल्याला प्रेत न दिसण्याची काळजी घेत राहतात. )

उमाबाई : अय्या ! मजेदारच दिसतोय पोतंवाला हा ! आपण काय खूनबीन करणारी माणसं आहोत का ?

देवरस : तो तरी खरंच पोतंवाला आहे का बघा -- मुळात पोती दारावर विकायला यायची पध्दत नाही -- तेही यावेळी -- आणि -- ( उमाबाईंजवळ जाऊन हळू आवाजात -- ) आणि आपल्याला अगदी हवं असताना ! मला संशय येतोय !

उमाबाई : ( तशाच आवाजात -- ) खरंच गं बाई -- ( कर्नलना -- ) अहो, इकडं या जरा -- ( पोतंवाला हे सगळं पाहतोय. कर्नल आहे तिथनंच --‘ का-य ? ’ म्हणतात.)

पोतंवाला : या बाईंना आपला संशयबिंशय येतोय का काय ? आयला, हे बरंय ! या वेळी पोतं तुम्ही विकत घेताय –- तरी मी तुमचा संशय घेत नाही -- आणि उलट तुम्हीच माझा संशय घेताय !

कर्नल : अगं, मुड्याचं ते काय असतं, बिझिनेस टॅक्ट असते त्यांची ! बोलायची ! पोतं घेतलं म्हणजे मुडदाच टाकला पाहिजे असं काही नसतं ते.

पोतंवाला : बरोबर सायेब !

उमाबाई : ( देवरसांना -- ) यांच्या डोक्यात एखादं आलं की, दुसरं काही कळायचंच नाही यांना -- ( पोतंवाल्याचं प्रेताकडे लक्ष जातं -- ते पाहून कर्नल मुद्दाम अधिक नॉर्मल होतात.)

कर्नल : आता तुम्हाला वाटेल की हा मुडदाच आहे -- आणि हा टाकण्यासाठीच आम्ही पोतं घेतोय -- पण तसं अजिबात नाही हां ! हा जर जागा झाला ना, तर आम्हाला जिवंत पोत्यात घालून आमचीच विल्हेवाट लावू शकेल तो !

पोतंवाला : ( प्रेताजवळ जाऊन -- पण लांबून वाकून पाहात --) म्हणजे नुसतेच झोपलेत म्हणा --

देवरस : कर्नल, हे असले तुमचे ' दम मारो दम ' मित्र आमच्याकडे आणत जाऊ नका !

कर्नल : अहो पण देवरस --

देवरस : ते काही नाही -- त्याला आधी जागं करा न् घराबाहेर व्हायला सांगा.

कर्नल : ( काही क्षण चकितपणे पाहून--) अहो, कसं शक्य आहे ते देवरस ?

पोतंवाला : बरं साहेब, जाऊ द्या ते -- आपले पैसे देऊन टाका --

उमाबाई : ( पटकन पर्स उचलून --) किती ?

पोतंवाला : शंभर रुपये.

कर्नल : नाही नाही -- नाय नाय -- अडवून मागताय तुम्ही -- अडवून मागताय !

पोतवाला : बरं, दहा द्या, चला -- पोतं एकदम मॉडर्न आहे आपलं ! बघून घ्या तुम्ही.

उमाबाई : पोत्याचं पोत पक्कं दिसतंय, पण कलर दुसरा नाही का मिळणार ?

पोतंवाला : एक तर या विचित्र टायमाला मी पोतं विकायला आलो.. आपल्याला मालात खोडी काढलेली आवडत नाही, राहू द्या. द्या ते इकडं !

कर्नल : अरे हो, हो, हो ! अग, दहा रूपये देऊन टाक बघू. उलट पोत्याचा हा नेहमीचा कलरच चांगला असतो. खास लक्ष जात नाही त्याच्याकडे -- त्यामुळं आतला मालही सुरक्षित राहतो.

देवरस : (कर्नलना -- ) कर्नल, तुम्ही विकत घेताय हे पोतं ! मी नाही ! ( कर्नल वैतागून पाहतात -- तिकडे दुर्लक्ष करून -- ) कशा घडतायत एकेक घटना ते लक्षात ठेवा --

कर्नल : ( उमाबाईंना-- ) असू दे. दे तू. ( उमाबाई पैसे देत असताना -- ) आयला,पाणी आणून मारतो त्याच्या तोंडावर.( आतून पाणी घेऊन येतात. पोतंवाला अजून उभा आहे हे पाहून --) बघा ना, बघा, पाणीच मारतो आता -- (प्रेताच्या तोंडावर पाणी शिंपडतात --) नाही. उठायचा नाही तो -- असं दहा-दहा वेळा शिंपडावं लागतं पाणी !

पोतंवाला: सायेब --

कर्नल : अरे ! अजून गेला नाहीत तुम्ही !

पोतंवाल: सायेब --

कर्नल : हं बोला, बोला, लौकर बोला !

पोतंवाला : मी एकदा शिंपडू का -- पाणी ? ( कर्नल खिन्नपणे त्याच्याकडे पाहतात.) एकदाच ! ( कर्नल त्याच्या हातात पाण्याचा तांब्या देतात. तो मोठ्ठी संधी मिळाल्याप्रमाणे पाणी शिंपडतो -- दर खेपेला -- आता तो उठेल ! आता तो उठेल ! आता तो उठेल ! -- अशा बेतात पाहतो. परंतु काहीही परिणाम होत नाही -- हे पाहून -- ) म्येलेबिले तर नाही ?

कर्नल : ( मोठ्यानं हसून --) तसंच आहे बाबा ते, तसंच आहे ! आम्हालासुध्दा अनेकदा वाटतं, मेलाय का काय ! बरं, पैसे मिळाले ना ?

पोतंवाला : अं ! हो, जातोच की आता.

उमाबाई : जा की मग, थांबलायस कशाला !

देवरस : अहो, पोतवाले -- पोतं कुणी घेतलं विकत ? यांनी ! हे कर्नल, म्हणजे कर्नल आहेत हे -- म्हणजे होते --

उमाबाई: असूं द्या आता -- घेतलं खरं ! जा बाबा तू.

पोतंवाला: बरं मला एक सांगा, खरंच तुम्हाला मुडदाबिडदा तर टाकायचा नाही ? उगीच आपल्यावर आफत नको -- हां ! मागं एकदा माझ्याकडून घेतलेलं पोतं होतं -- तर मलासुध्दा चौकीवर जावं लागलं होतं.

उमाबाई : नाही रे बाबा -- तसं काही नाही -- जा तू.

पोतंवाला : (काही क्षण पाहून --) नको, हे पैसे घ्या तुमचे परत.आपलं पोतं आपल्याला देऊन टाका. उगीच झंझट नको !

देवरस : कर्नल, तुम्ही तुमच्या त्या मित्राला जागं करा, म्हणजे त्याचा विश्वास बसेल.( कर्नल पेचात सापडल्याप्रमाणे पाहतात.) काय चूक आहे का उमाबाई यात ?

उमाबाई : ( पोतंवाल्याजवळ जाऊन लाडिकपणे -- ) तसं काही नाही रे ! जा तू ! ( असं म्हणून त्याच्या हनुवटीवरून हात फिरवतात. तो अतिशय खुश होतो. त्या तंद्रीतच बाहेर जातो.)

देवरस : ( पाहून -- ) गेला वाटतं एकदाचा ! ( तिघेही सुस्कारतात. तोच पोतंवाला पुन्हा येतो. )

उमाबाई : ( पोतंवाल्याकडे पाहून--) काय ?

पोतंवाला : ( हुरळून -- ) परत एकदा --

उमाबाई : ( पुढे होतात, पुन्हा त्याच्या हनुवटीवरून हात फिरवतात --) जा हं आता ! ( तो जातो. उमाबाई दार लावतात. त्या मागे वळतात तोच पुन्हा दार वाजतं -- ) चटावला मेला ! ( दार उघडतात. पोतंवाला येतो. आता तो जरा सचिंत दिसतो. रमाबाईंकडे पाहातोय -- ) काय आता ?

पोतंवाला : त्यांचं झालं, ( रमाबाईंकडे बोट दाखवून ) यांचं काय ?

उमाबाई : या होय ? जिवंतच आहेत. बघ हं -- ( रमाबाईंजवळ जाऊन --) रमाबाई, छत्र्यांचं काय करताय मग ?

रमाबाई : काढायच्या ना, काढायच्या !

उमाबाई : पाह्यलंस ? जिवंतच आहेत. आणि आम्ही तर दिसतोच आहोत तुला -- जिवंत ! ( हनुवटीवरून पुन्हा हात फिरवत -- ) आणि तू तर जाणारच आहेस ना ! ( या वेळी तो धूम पळून जातो. उमाबाई दारात उभं राहून काही क्षण पाहतात, नंतर वळून, दार लावून --) आता मात्र गेला ! ( पुढे येतात आणि तांब्यातील पाण्याने हात धुतात.) डर्टी होती हनुवटी !

देवरस : आता वाजेल पोलिसांची शिटी ! मग याल मेटाकुटी-ला !

कर्नल : शिटी काय !-- शिट्टी म्हणा शिट्टी ! शिटी म्हणे !

रमाबाई : कोण वाजवतंय शिट्टी ?

देवरस : कुणी नाही ! कुणी नाही ! ( वळून --) बाजा वाजेल आता, बाजा -- सगळ्यांचा ! बसा आता ! ( कर्नल खरोखरच बसतात अन् चटकन उभे राहतात -- ) पोलीसांचाच माणूस असणार तो ! पाच मिनिटांत पोलीस येतील आणि दहा मिनिटांत सगळा गोंधळ उडवून जातील इथं ! आमचं घर बरबाद केलंत तुम्ही कर्नल, आमचं घर बरबाद केलंत !

कर्नल : मी ? मी ? मी ? मी ?

देवरस : आणि आता हे वातावरण आपल्याबद्दल इतका संशय निर्माण करणार आहे की विचारू नका –

त्यापेक्षा, आपणहून जाऊन रिपोर्ट दिला असता पोलीसात, तर जरा चांगुलपणा तरी राहिला असता.

कर्नल : अहो देवरस, असली बातमी घेऊन पोलीसात जाणाऱ्याला पोलीस चांगुलपणा देतात म्हणून कुणी सांगितलं तुम्हाला ! कुठल्या जगात वावरताय तुम्ही ? पोलीस पोषाखावरून कसा ओळखावा एवढीच फक्त माहितीय तुम्हाला पोलिसांबद्दल ! तेवढं तर शेंबड्या पोरालाही कळेल ! अहो, पोलीस असला चांगुलपणा वगैरे देत बसले तर, कुणालातरी कुठेतरी अडकवणं, कुणावर तरी गुन्ह्यांचे आरोप ठेवणं, प्रत्यक्ष गुन्हे केलेल्या माणसांना सोडवायचे प्रयत्न करणं -- ही कामं कोण करणार मग ? आपण काहीही केलं तरी,पोलिसांच्या दृष्टीनं पाहिल्यांदा आपण गुन्हेगारच ठरणार हे पक्कं लक्षात ठेवा तुम्ही, आणि पोलीस म्हणजे देव आहेत असं समजून सारखा धावा करत राहू नका त्यांचा -- च्यायला, पोलीस, पोलीस, पोलीस -- काय लावलंय काय ! सध्याच्या परिस्थितीत पोलीस म्हणजे आपला शत्रू आहे हे पक्कं लक्षात घ्या तुम्ही -- कधी जाबजबाब द्यायला गेलाय तुम्ही चौकीवर ?

देवरस : अजून तरी नाही.

कर्नल : मग बोलूं नका हो तुम्ही या विषयावर. सगळी दुनिया आपल्याला समजते या भ्रमात वावरायची काही गरज आहे का ?

उमाबाई : मी काय म्हणते, आपण सगळेच सापडलोय की नाही या प्रसंगात ? उगीच आपसात वाद कशाला करत बसायचं ?

देवरस : कर्नल, एक तर ते पोतं तुम्ही विकत घेतलंत ! आणि दुसरं एक माझ्या लक्षात आलंय -- ते म्हणजे तुम्ही निष्कारण शिवलात त्या प्रेताला -- तुमच्या हातांचे ठसे सापडणार त्या प्रेतावर.

कर्नल : अहो, या जगात लक्षावधी गोष्टींवर माझ्या हातांचे ठसे असतील, म्हणजे काही मी जबाबदार नाही त्या सगळ्या गोष्टींना -- कळलं ? आणि समजा, गळा दाबून त्याचा खून झाला असला, तर गळ्यावर तरी दुसरे ठसे मिळतील की नाही ?

देवरस : बघा बुवा !

कर्नल : बघा बुवा काय ? म्हणजे तुम्ही काय नामानिराळे व्हायला बघताय का काय ? च्यायला, प्रेत निघालं तुमच्या घरात, आणि मला म्हणताय -- बघा बुवा !

रमाबाई : ( डोळे मिटूनच‘-- ) कर्नल, तुमचं न आमचं घर वेगळं का आहे ? ( रमाबाई ऐकतायत हे पाहून सगळे चकित. )

देवरस : ( जरा वेळानं -- ) काहीही म्हणा, पण कर्नल, जास्त धाडसीपणाही काही वेळा अंगाशी येतो --

कर्नल म्हणजे काय, म्हणायचंय काय तुम्हाला ?

देवरस : दुसरं काही नाही, मला तुमची काळजी वाटतेय --

कर्नल : ( चिडून -- ) तुम्ही -- घालतोच आता ते प्रेत पोत्यात -- उमा, इकडे ये ! ( उमाबाईंच्या मदतीनं कर्नल प्रेत पोत्यात बंद करू लागतात.)

देवरस : ऐका तर खरं. मी काय म्हणतो, उगीच उतावळेपणा करून आत्महत्या केल्यासारखं सगळ्यांनी आत जाण्यात काय अर्थ आहे ? आपल्या दोघांपैकी कुणीतरी एकजण बाहेर राह्यला, तर या दोघींची काळजी घेण्याच्या दृष्टीनंही ते बरं नाही का ? -- तर तुमच्या विरुध्द जर पुरावा तयार होऊ शकत असला, तर मला आणखी कशाला ओढताय याच्यात ? ( कर्नल संतप्त, तोंडून शब्द फुटत नाही. ) तुम्ही आत गेलात तर बाहेरची काही काळजी करू नका तुम्ही. उमाबाई इथं राहतील आमच्याबरोबर. त्यांचं हवं-नको मी सगळं बघीन -- फार तर त्यांचं मन रमवण्यासाठी एकदोन महिने अमेरिकेला जाऊन येऊ आम्ही. तुमची शिल्लक असेलच तेवढी बँकेत !

कर्नल : च्यायला, मला पार धुऊन काढून आयुष्यातून उठवायचं ठरवलंय की काय तुम्ही ? मला का मेन रोल देताय तुम्ही ? ( पोतं बांधून होतं -- )

उमाबाई : अहो, चिडताय का तुम्ही असे ? देवरसांचं काय चूक आहे ? तुम्ही तर रिटायर झालायत -- ते झालेत का अजून रिटायर ?

कर्नल : देवरसांचं बरोबर आहे ! च्यायला, कुठंतरी जाऊन उडीच मारतो मी आता. आयला, वैताग आहे ! वैताग आहे !! ( डोकं गच्च पकडून कर्नल बसलेले -- काही क्षण शांतता. )

रमाबाई : ( तशाच -- ) गेले की काय कर्नल ? आवाज कसा येत नाहीय त्यांचा ?

उमाबाई : आहेत ! आहेत ! मी कसं जाऊ देईन त्यांना ?

कर्नल : तेच की ! तू आत जाऊ देशील मला -- पण वरनं खाली जाऊ देणार नाहीस -- ( काही क्षण शांतता. )

देवरस : मला वाटतं, बाहेर काय परिस्थिती तयार झालीय ते बघा तुम्ही कर्नल, दार उघडून !

कर्नल : च्यायला, मला आत जायच्या आत वेडा करायचं ठरवलंय का काय तुम्ही ? ( दारावरची बेल वाजते. )

देवरस : आले ! आता पाचसात पोलीस, एकदोन इन्स्पेक्टर्स, आणि शेदोनशे माणसांची गर्दी येणार घरात ! कर्नल, उघडा दार ! ( कर्नल भरभर हालचाली करत पोतं कडेला ओढून ठेवतात. )

कर्नल घर कुणाचंय ? तुम्हीच उघडा.

देवरस : अहो, तसं नाही कर्नल -- तोपर्यंत हे घड्याळबिड्याळ.. किंमती चीजवस्तू मी उचलून आत ठेवतो. एवढ्या गर्दीत काही गेलंबिलं तर काय कळणार आहे ? ( पुन्हा बेल वाजते. )

उमाबाई : मी उघडते. आहे काय त्यात ?

रमाबाई : काय उघडताय उमाबाई ?

देवरस : छत्री नव्हे ! ( उमाबाईंना -- ) उघडा तुम्ही ! ( उमाबाई दार उघडायला पुढे होतात ) जाऊ दे ! आता काही उचलत नाही न् ठेवत नाही. जाईल ते जाईल अन् राहील ते राहील ! पण मधनंमधनं तुम्हीही लक्ष ठेवा कर्नल ! हिनं एक डोळे उघडले नाहीत म्हणजे मिळवली !

उमाबाई : ( दाराशी थांबून -- ) कोण आहे ? ( आवाज नाही.) कोणाय ? ( बाहेरून आवाज -- ‘ मी हवालदार ! ‘ कर्नल दचकून उभे. देवरस, हे घडणारच होतं अशा पोझमध्ये. उमाबाई आलटून पालटून कर्नल व देवरस यांच्याकडे पाहात आहेत. पुन्हा आवाज -- ‘ मी हवालदाराय -- उघडा दार ! ‘ )

कर्नल : ( देवरसांना -- ) ‘ हवालदार ’ असं काहीतरी ऐकू आलं का हो तुम्हाला ?

देवरस : असं काहीतरी नव्हे -- हवालदारच !

कर्नल : ( रडू फुटत -- ) ह-वा-ल-दा-र !

देवरस : उघडा दार !

कर्नल : ( रमाबाईंकडे पाहतात. त्यांच्या दिशेने पुढे होत --) मला जायचं नव्हतं रमाबाई, मला जायचं नव्हतं ! पण आता जावंच लागेल ! क्षमा करा मला, क्षमा करा !

देवरस : आता रडून काय उपयोग आहे ? बसा आता भोगत केल्या कर्माची फळं ! उभे राहतायत !

कर्नल : फसवला गेलो मी, पार लुबाडला गेलो ! ( बाहेरून बेल व आवाज ‘ दार उघडता की नै ? ‘ बेड्या घालण्यासाठी हात पुढे करत --) उघड दार उमा, उघड दार ! ( उमाबाई हुंदका देतात व सावकाश दार उघडू लागतात..पडदा पडत जातो...)

**अंक दुसरा समाप्त**

## अंक तिसरा

( दुस-या अंकाच्या प्रसंगावरून पुढे सुरू.. उमाबाई दार उघडतात. दारात पोतंवाल्यासारखाच दिसणारा हवालदार. टिप-टॉप हवालदारी पोषाखात. गुळगुळीत दाढी वगैरे केलेला. त्याला पाहून सगळेच दचकतात. हवालदार पुढे येतो.)

कर्नल : ( हवालदार काही बोलण्यापूर्वीच -- ) हे कसं काय ? हे कसं काय ?

हवालदार: काय कसं काय ?

कर्नल : बरंय, तुमचं कसं काय ?

हवालदार : माझंही बरंय, कळलं का ? माझंही बरं आहे ! पण तुम्ही काय विचारत होता ?

उमाबाई : काही नाही. तुम्ही त्या ह्यांच्यासारखेच दिसता -- पोतंवाल्यासारखे ! ते जरा विशेष वाटलं आम्हाला --

कर्नल : आयला ! भूतबंगला झालाय तुमचं घर म्हणजे देवरस, आपण तरी तेच आहोत का -- मुळातले ? कठीण आहे ! कठीण आहे !

हवालदार: पोतं गेलं खड्डयात ! कोण पोतंवाला ? फालतू बकवास नकोय ! मी इथंच थांबणाराय आता ! साहेब येतीलच थोड्या वेळात !

देवरस : कोण.. म्हणजे ते ... दिनकर पुरोहित का कायसंसं नाव आहे त्यांचं, तेच का ?

हवालदार: हो ! तेच. ( कर्नल पोत्याकडे सचिंत पाहतात. )

कर्नल : बरं, तुमचं नाव काय ?

हवालदार: हवालदार !

कर्नल : नाही, ते नाही, तुमचं नाव विचारलं मी.

हवालदार: आर.डी. हवालदार ! रमाकांत दिनकर हवालदार !

कर्नल : हे बघा आर्डी, हे काय चाललंय, आम्हाला काही समजत नाहीय, काय चाललंय हे ?

हवालदार : कळेल ! तुम्हालाही कळेल, आम्हालाही कळेल. सगळ्यांना कळेल !

कर्नल : काय म्हणालात ? ( उमाबाई कर्नलना मागे घेतात --)

उमाबाई : ( फक्त कर्नलना -- ) रमाबाईंना जागं करू या आपण -- म्हणजे गुंतून तरी राहील हा हवालदार !

कर्नल : आयडिया ! शेवटी सगळ्या महत्त्वाच्या प्रसंगी रमाबाईच उपयोगी पडतात मला ! तू सुध्दा मान्य केलंस हे बरं झालं ! ( दरम्यान हवालदाराचे रमाबाईंकडे लक्ष गेलेले आहे. )

देवरस : ( हवालदाराला -- ) माझी बायकोय ती ! बायको ! पत्नी !

हवालदार: हां -- ( कर्नलना -- ) काय बोलताय तुम्ही ? ( उमाबाई पुढे येतात व त्याच्या हनुवटीला हात लावू लागतात. तो झटकन बाजूला होतो. )

उमाबाई : ( लाडिकपणे -- ) काही नाही, असंच ! लावू हात हनुवटीला ?

हवालदार: का ?

उमाबाई : काही नाही. बरं वाटतं !

कर्नल : रमाबाईंची न् तुमची ओळख करून देऊ का ?

हवालदार: का ?

उमाबाई : ( हनुवटीला हात लावायचा प्रयत्न करत -- ) सहज !

हवालदार: ( मागे होत -- ) नको !

कर्नल : हं घर यांचंय -- देवरसांचं ! हे देवरस ! न् या रमाबाई -- यांच्या पत्नी !

रमाबाई : तुमचं न् आमचं घर वेगळं का आहे कर्नल ?

कर्नल : ( झटपट पुढे होऊन -- ) रमाबाई, उठा, जाग्या व्हा ! डोळे उघडा ! पाह्यलंत का कोण आलंय ? हवालदार आलेत. आर्डी आलेत ! हवालदार आलेत !

रमाबाई : प्रेताचं काय झालं ? ( सगळे दचकतात, इकडेतिकडे पाहतात.)

कर्नल : ( खोटं खोटं हसत -- ) कमालय हं आर्डीसाहेब रिअली ! मी यांना प्रेतासारखं पडून दाखवलं, तर या मला अजून घाबरल्यासारखं करून दाखवतायत. ( रमाबाईंना -- ) रमाबाई, बास आता ! प्रेत नाही न् काही नाही -- बघा बरं.

देवरस : ( हवालदाराजवळ येऊन -- ) आमच्या घरात येऊन बसण्याचा उद्देश ?

हवालदार: ( दोन क्षण त्यांच्याकडे पाहून -- ) कळेल ! कळेल !

कर्नल : ( हवालदाराला -- ) मी जरा यांना ( रमाबाईकडे बोट-- ) आत घेऊन जाऊ का ?

हवालदार: ( देवरसांकडे बोट दाखवत -- ) यांच्या पत्नी आहेत ना त्या ? त्यांना विचारा.

देवरस : हो. जा ना, चालेल. उमाबाई तुम्ही इकडे या. कर्नल, तुम्ही हिला घेऊन आत जा, उमाबाई इकडे या, आणि हवालदारसाहेब, तुम्ही जरा बाहेर थांबा.

हवालदार: आं ? काय म्हणालात ?

देवरस : काही नाही, बसा – बसा म्हटलं ! ( कर्नल रमाबाईंना घेऊन आत जातात. देवरस उमाबाईंजवळ येतात.) काही काळजी करू नका, मी आहे. कर्नलनी ‘ आत ’ जायचा निश्चय केलेला दिसतोय ! पण मी आहे, काळजी करू नका !

हवालदार: ( उठून हातातल्या काठीनं इकडे तिकडे टोकत -- ) तुम्ही सगळे दाखवताय तर असं की, अजून इथं काही घडलेलं नाही -- पण बनवाबनवी किती वेळ टिकेल ? ( पोत्यावर काठी मारून -- ) काय आहे या पोत्यात ?

देवरस : ते पोतं होय ? ते पोतं म्हणजे एक त्रास होऊन बसलाय ! निवडणुकीला उभे राहणार हे -- म्हंजे हे आपले कर्नल. आणि काय काय ते पोस्टर्स, पत्रकं, बोर्डस म्हणा -- ही सगळी अडगळ मात्र आमच्या घरात ! आणि आता तर निवडणुकीला उभं राह्यचंच कॅन्सल केलंय त्यांनी.

हवालदार: का ?

देवरस : अहो, काय ते त्यांना धमकीचं पत्रं आलं -- घाबरले लगेच ! तसा माणूस पापभीरू हं ! अगदी पापभीरू म्हणतात ना, तसा !

हवालदार: ( पुन्हा एकदा पोत्याकडे पाहून पुढे जात --) अस्सं ! इकडे कायाय ?

देवरस : काही नाही, गॅलरीय एक आपली छोटीशी. लहानचाय तशी !

हवालदार: ( पुढे होत -- ) अस्सं ! ( कर्नल व रमाबाई बाहेर येतात.)

रमाबाई : पटलं मला कर्नल, पटलं म्हटलं ना ! माझा तुमच्यावर जितका विश्वासाय तितका कुणावरच नाही. ( देवरस वळून रमाबाईंकडे पाहतात.) भास म्हणजे कसला तो, अगदी खरं वाटत होतं सगळं ! हा भासाय असं वाटतच नव्हतं ! प्रेत म्हणजे अगदी खरोखरचं प्रेत वाटत होतं अगदी !

हवालदार: प्रेत ! कुणाचं प्रेत ? कुठाय प्रेत ?

रमाबाई : ( हसून -- ) अहो खरोखरचं नाही काही प्रेत हवालदार -- भासातलं ! कर्नलनी सांगितलं सगळं मला आत्ता -- काय काय बडबडत होते मी ते. मला म्हणे असं वाटत होतं की, घरातच प्रेत सापडलंय एक ! तो दिनकर पुरोहित का कोण मेला सांगून गेला होता ना -- तसं !

हवालदार: नीट बोला ! ( कर्नलना -- ) काय म्हणतायत या बाई ?

कर्नल : काही विशेष नाही हो. त्यांना मघाशी चक्कर आली होती ना -- त्यातलं थोडंथोडं आठवतंय त्यांना --

हवालदार: अस्सं !

रमाबाई : हवालदारसाहेब, तुम्ही इथं थांबलायत हे फार चांगलंय हं -- नाहीतर पुन्हा चक्कर आली असती मला – प्रेत पाहिल्यावर चक्कर येणं म्हणजे कमकुवतपणा झाला का हो हवालदारसाहेब ?

हवालदार: प्रेत पाहिल्यावर ?

कर्नल : भासातलं -- भासातलं !

हवालदार: हां मग ठीकाय -- भासातलं प्रेत काय -- मग ठीक आहे. भासातलं ठीक आहे. भासातलं ..

रमाबाई : हं, बरं आठवलं, का हो हवालदारसाहेब, तुम्ही छत्री नाही वापरत ?

हवालदार : का ?

रमाबाई : नाही, मला असं विचारायचं होतं, की तुम्ही काड्या-दांड्यांची छत्री वापरता -- होय की नाही ? पण समजा, बिनकाड्यांची अन् बिनदांड्याची छत्री जर काढली तर तुम्हाला कसं वाटेल ?

हवालदार: का ?

रमाबाई : काही नाही. हलकं अन् सुटसुटीत वाटेल की नाही ?

हवालदार : हे बघा बाई, तुमचं डोकं ठिकाणावर नसलं तरी, माझं आहे. अजून इतकी काही परिस्थिती झालेली नाही माझी --

कर्नल : मी म्हटलं नाही का रमाबाई तुम्हाला ! एकदम फार पुढच्या गोष्टी पचत नाहीत लोकांना ! तुम्ही काय करायला पाहिजे, हळूहळू सुधारणा करायला पाहिजे -- म्हणजे असं की, सुरुवाती सुरुवातीला दोन काड्या कमी लावायच्या -- ते पचलं की, आणखी दोन कमी करायच्या, आणि सगळ्यात शेवटी दांडा कमी करायचा !

हवालदार : आणि कापड ?

रमाबाई : इश्श ! अहो कापडाशिवाय छत्री कशी असेल हवालदारसाहेब ?

हवालदार: हां, ते पण बरोबरच -

कर्नल : आर्डी म्हणतात तशी जर छत्री लोकांना पचली, तर मग सरळ पावसात भिजतच जाता येईल. आर्डी, पण आहे हं -- तुमचे पण विचार -- हवालदार असून -- काळाच्या पुढचेयत.

हवालदार: हां -- जमतं कधी कधी --

कर्नल : काहो देवरस, नाही म्हणजे,‘ बिनकापडाची छत्री ’ हा विचार म्हणजे कसला विचार म्हणाल तुम्ही !

देवरस : हा ना -- याला मी .. याला मी ..

कर्नल : थांबा थांबा ! अगदी.. म्हणजे सांगितलंच पाहिजे असं नाही -- कळतंय -- आम्हालाही कळतंय ! -- आर्डी, यांची ओळख करून देतो तुम्हाला -- हे श्री. उमाकांत देवरस -- लवकरच यांचं एक भलं मोठं पुस्तक प्रसिध्द व्हायचंय ! पण मला वाटतं, नुकतंच ते कॅन्सल झालंय -- ( देवरसना -- ) का कॅन्सल झालं हो ते ?

हवालदार: का ?

कर्नल : काही नाही, कागदटंचाई.

हवालदार: अस्सं !

देवरस : नेहमीप्रमाणं कर्नल -- तुम्ही उमाबाईंवर अन्याय करताय.

कर्नल : कसं काय ? कसं काय ?

देवरस : हिची छत्री उडाली ! माझं पुस्तक बुडालं ! तुमची निवडणूक घाबरटपणामुळे -- भित्रटपणामुळे -- भेकडपणामुळे गाडली गेली. पण कर्नल, उमाबाईंच्या अमेरिकेची तुम्हाला काहीच चिंता दिसत नाही ! उमाबाईंची अमेरिका ही माझी अमेरिका समजतो मी कर्नल ! हे मी चालू देणार नाही.

कर्नल : हिच्या अमेरिकेत सारखं जा-ये करून कंटाळून गेलोय मी ! आता तर मला कुठल्याच अमेरिकेचं काहीच वाटत नाही.

उमाबाई : नुस्ते रिटायर झालाय तुम्ही !

देवरस : पण मी अजून रिटायर झालेलो नाही उमाबाई ! एक प्रेसिडेंट रिटायर झाला की, अमेरिका दुसऱ्या प्रेसिडेंटची निवड करतेच की नाही ? लोकशाहीमुळं कित्येक प्रेसिडेंटांचे खून झाले ! पण प्रेसिडेंटशिवाय अमेरिका राहूली नाही !

हवालदार: ( कर्नलना बाजूला घेत -- ) यांना पण होतात भास ?

कर्नल : नाही, नाही, नाही. यांना भास होतोय असा आपल्याला भास होतोय. आता उदारणार्थ, तुम्हालाच काय, मलासुध्दा वाटतंय की हे फक्त अमेरिका या देशाबद्दलच बोलतायत. पण तसं नसतं ते ! आणखी कायकाय असतं त्यांच्या मनात आणि बऱ्याच वेळेला हिला कळतं ते बरोबर ! बघा तिचा चेहरा कसा फुललेला दिसतोय !

हवालदार: ( पाहून -- ) हां ऽ --

रमाबाई : भास संपल्यावर अगदी मोकळं ऽ वाटतं गं बाई ! प्रेत नाहीचाय म्हणजे घरात. ( यावर तिघेही टेन्स. )

हवालदार: बाई, तुम्ही आता कृपा करा -- प्रेताबद्दल काही बोलू नका, मला निष्कारण काहीतरी सापडत असल्यासारखा ताण येतो.

रमाबाई : बरं बाई, जाऊ दे ते. कोणकोण असतं घरी तुमच्या ?

हवालदार: का ?

रमाबाई : कमालचाय तुमची हवालदार ! सहज विचारत नाही का माणूस ?

देवरस : सहज झालं तरी, हवालदाराला विचारायचं नसतं हे ! खुळचटपणा एकेक !

कर्नल : काही नाही, विचारा तुम्ही रमाबाई ! बरोबरय ते ! हवालदार झाला तरी, माणसं असतातच की नाही घरी त्याच्या ? हवालदार असो -- कुणीही असो -- माणूस म्हटला की तो चिडतो, प्रेम करतो, आतुर होतो, हवालदिल होतो आणि --

देवरस : प्रेमानं आतुर झालेला हवालदार ! पटत नाही !

रमाबाई : असं कसं म्हणता ? आता आपले सुळे डॉक्टरच घ्या ! स्वत: दातांचे डॉक्टर असून दात नाही काढले त्यांचे ? सुळ्यांसकट ? ( कर्नल विजयी हसतात. )

देवरस : ( त्यांच्यासरखेच वेडावून हसून -- ) नुसतं दुसऱ्याला हसायची अक्कल असली की, आपला विजय झाल्याच्या भावनेत राहू शकतो माणूस.

कर्नल : काय ? काय म्हणालात ?

देवरस : अवघडाय जरा ते ! हसणं सोपं असतं, हसत राहा तुम्ही ! हसा नुसते !

रमाबाई : अहो कर्नल ! एक महत्त्वाचं आलं होतं माझ्या डोक्यात ! पण माझं मेलीचं बोलायचंच राहून जातं --

कर्नल : ( रमाबाईंजवळ जाऊन बसत -- ) अहो, आता बोला रमाबाई -- आहे ना मी ऐकायला --

रमाबाई : ती जी चिठ्ठी आली होती तुम्हाला, त्याच्यात पत्ता होता का हो लिहिणाऱ्याचा ?

कर्नल : नव्हता. पण समजा असता तर काय ?

रमाबाई : आपण जाऊन बोलणी केली असती त्यांच्याशी ! मला बाई अजूनही असं वाटतं की, उभं राहावंच तुम्ही.

देवरस : अशी चिठ्ठी पाठवणं हा कायद्यानं गुन्हा असतो. आणि प्रत्येक गुन्हेगार आपला गुन्हा लपवायच्याच प्रयत्नात असतो -- ( हेतूपूर्वक -- ) काय कर्नल ?

कर्नल : अं ? हो ! ते बरोबर, तरीपण एक शक्यता म्हणून रमाबाईंचा विचार काही अगदीच चूक नाही !

देवरस : आता बिनकाड्यांची, मलूल, लुळी छत्रीही चालते तुम्हाला !

हवालदार: ( पुढे येऊन सगळ्यांचं लक्ष वेधत -- ) बरं, जाऊ द्या ते सगळं. मला एक शंका येतेय की इथं काहीतरी घडून गेलेलं असलं पाहिजे. कृपा करून सांगता का मला ? काय घडून गेलंय ते ?

कर्नल : अहो, आम्ही कसं काय सांगणार -- तुम्ही शोधून काढायचं असतं ते आर्डी --

हवालदार: काय म्हणालात ?

उमाबाई : तसं विशेष काही घडलेलं नाही -- असं म्हणाले ते.

देवरस : म्हणजे कर्नलचा संशय यायच्याऐवजी आमचा सर्वांचाच संशय येतोय की काय तुम्हाला !

कर्नल : नाय नाय देवरस -- असं नाय चालणार ! गावांची नावं फोडताय तुम्ही !

हवालदार: म्हणजे इथं काय भेंडया चालल्यात काय ? ( कर्नलना दरडावून -- ) काय भानगडाय कर्नल ! बोला – सांगा झटपट ... आघाडी सोडून पळायचा प्रयत्न करू नका.

देवरस : हवालदारसाहेब ! ते फक्त भित्रेपणात आघाडीवर असतात -- लष्करात असताना ते कधी आघाडीवर राहिले असतील असं वाटत नाही. कुणी लष्करात भरती करून घेतलं यांना, ते बघायलाच पाहिजे.

कर्नल : काय बोलताय तुम्ही देवरस -- इतकं सगळं घडलं त्यात धाडसाचं काम एक तरी केलंत का तुम्ही ? पाह्यलं रमाबाईंनी ! बाहेर ओढत आणलं मी ! आत भरायला मदत केली हिनं ! भरलं मी ! बंद केलं मी ! सरकवून ठेवलं ते मीच ! तुम्ही काय केलंत ? नुसतं बघत बसण्यापलिकडे आणि मागंमागं राहण्या पलिकडे काय केलंत तुम्ही ? काय केलंत -- बोला !

हवालदार: ( ओरडतो -- ) का--य ? कशाबद्दलाय हे सगळं ? कशाबद्दल ?

कर्नल : भले, आर्डी, भले ! काहीही बोललं तरी, तुम्हाला वाटतं की ते प्रेताबिताबद्दल असेल ! जशी दृष्टी तशी सृष्टी ! पण तसं नसतं आर्डी ! रमाबाईंचा भास म्हणजे खरोखरचं प्रेत असं समजायचं का आपण ? आपल्याला भास होत नसताना --?

हवालदार: हे इंजिन चालल्यासारखं भास-भास-भास काय लावलंय ? भानगड आहे इथं काहीतरी, भानगड आहेच ! ( डोळ्यांत चमक येऊन, पोत्याजवळ जाऊन --) या पोत्यात कायाय ? कायाय या पोत्यात ? कर्नल, फक्त तुम्ही बोला -- देवरस, तुम्ही गप्प बसा -- बाकी कुणाचं उत्तरं नकोय मला -- तुमचं उत्तर हवंय.

कर्नल : ( अत्यंत खोटं हसून -- ) आता हे सगळं मला कसं माहीत असणार आर्डी ? यांच्या घरातलं, यांचं पोतं ! यांनाच विचारा ! ( रमाबाईंना एकीकडे -- ) तुम्हाला मी सांगितलेलं आहेच सगळं पण तुम्ही काही बोलू नका या विषयावर -- प्लीज -- ( उघड -- ) -- यांना विचारा !

हवालदार: सगळ्यांना विचारत बसण्यापेक्षा उघडूनच बघतो !

कर्नल : तसं करा, चालेल ! ( इथं पहिला दिनकर पुरोहित घाईन प्रवेश करतो. सगळे झटपट सावध होतात. फक्त रमाबाई नॉर्मल. )

रमाबाई : अहो, किती वेळ लावलात तुम्ही ?

पुरोहित : ( हवालदाराला -- ) बरं हवालदार, तुम्ही ताबडतोब बाहेर जा ! नंबर चारच्या कॉर्नरला उभे रहा. हैदर

पानवाला तुम्हाला टिप्स देईल. गो. बी क्विक !

हवालदार: ( काकुळतीनं --) साहेब हे पोतं -- या पोत्यात --

पुरोहित : पोतं नेऊन बुडवा ते नदीत ! सांगितलेलं काम करा झटपट ! बी क्विक ! ( हवालदार झटपट बाहेर जाऊ लागतो --)

कर्नल : अहो, आर्डी -- ( हवालदार दचकून वळतो -- ) तेच पोतं नेऊन नदीत बुडवा म्हणाले ना --?

हवालदार: हो ! ते राह्यलंच -- ( असं म्हणत पोत्याकडे जातो.)

पुरोहित : गेटाऊट ! यू फूल ! ( हवालदार जातो.) खून घडून गेलाय खून ! ( फक्त रमाबाई दचकलेल्या, बाकीचे नॉर्मल. ) तुम्हाला काही माहिती आहे ? आहे का काही माहती ? बोला लौकर !

रमाबाई : कुणाचा खून म्हणताय तुम्ही ? आता पुन्हा कसले भास नकोत हं मला !

देवरस : मला तर काही माहिती नाही बुवा ! तुम्हाला काही माहिती असलं तर सांगून टाका कर्नल !

कर्नल : बरं, या पुरोहित, मी सांगतो तुम्हाला, या !

पुरोहित : हं ! बोला ! बोला !

कर्नल : इथं आम्हाला कुणालाच काही माहिती नाही ! आता आमच्या नकळत इथं काही घडलंय असं काही म्हणायचंय का तुम्हाला ?

पुरोहित : हजार गुन्हेगार खेळवलेत मी आतापर्यंत ! मला असं नाही कुणी भेटलं ! --

कर्नल : म्हणजे आम्ही गुन्हेगार आहोत असं म्हणायचंय का तुम्हाला --

पुरोहित : उलटं चाललंय हे कर्नल -- उलटं चाललंय -- मी प्रश्न विचारायचे असतात तुम्हाला !

कर्नल : अहो, पण तुमचा प्रश्न, आम्हाला कळला नाही, तर विचारून घ्यायला नको ? ( दिनकर पुरोहित सुस्कारा टाकतो -- ‘ ओह ’ म्हणतो. )

देवरस : मी काय म्हणतो पुरोहित --

पुरोहित : काहीही म्हणू नका ! शांत राहा सगळे -- शांत राहा ! घाई करायचं काही कारण नाही. शोधून काढूनच दाखवतो मी.

कर्नल : मग त्या आर्डी हवालदाराला कशाला एवढी घाई केलीत ?

पुरोहित : सगळे रस्ते रोखून ठेवलेत आम्ही ! प्रेत या एरियाच्या बाहेर कुठंही जाऊ शकणार नाही.

रमाबाई : आता नको बाई प्रेत. जिवंत माणसाचं काही तरी बोलू या ...

पुरोहित : या कोण बाई आहेत ?

कर्नल : रमाबाई आहेत.

देवरस : माझी पत्नी.

उमाबाई : आम्ही दोघी मैत्रिणी आहोत !

कर्नल : मी पण त्यांचा मित्र आहे !

उमाबाई : काय ?

कर्नल : त्यांचा म्हणजे देवरस आणि रमाबाई अशा दोघांचा.

पुरोहित : फालतू प्रश्नांची सविस्तर उत्तरं देताय तुम्ही.

कर्नल : फालतू प्रश्न विचारूच नका तुम्ही. मग विचारणार तरी काय म्हणा !

पुराहित : अं ?

कर्नल : हां !

पुरोहित : काय ?

कर्नल : काही नाही.

पुरोहित : आयला, चेकमेट करून टाकलीय तुम्ही ! कुठं हलायलाच जागा नाही.

रमाबाई : पाहिल्यांदा आले तेव्हा किती हुशार वाटत होते हे !

पुरोहित : वैफल्यग्रस्त व्हायला लागलोय मी हळूहळू !

कर्नल : वैफल्याचीसुध्दा सवय होते हळूहळू -- आता हे देवरस -- झालं का पुस्तक लिहून ? आलं ना वैफल्य ? पण वाटतंय का त्यांना काही ? -- बघा. चेहरा बघून सांगा !

देवरस : एवढ्या मोठ्या निवडणुकीपुढं आमच्या पुस्तकाचं ते काय कर्नल ? आम्ही छोटे, आमचं वैफल्य छोटं, त्याचं आम्हाला काही वाटणं पण छोटं !

कर्नल : थोडक्यात म्हणजे, तुमचं सगळं छोटं ! आणि त्याचंही तुम्हाला काही वाटत नाही ! पण रमाबाईंच्या सुखदु:खाचा विचार केलात तुम्ही कधी ?

पुरोहित : झक मारली न् माझ्या वैफल्याचा विषय काढला मी तुमच्याजवळ ! पण मात करीन मी वैफल्यावर. (सावरून -- ) ठीकाय. मी तुम्हाला काही प्रश्न विचारतो -- त्यांची तुम्ही सरळ उत्तरं द्या.

कर्नल : ठीक आहे. अगदी सरळसरळ उत्तरं देऊ. विचारा. कितीही विचारा.

देवरस : उगीच ते जास्त विचारणं बिचारणं नको.फक्त त्या पोत्यात काय आहे तेच विचारा त्यांना.

पुरोहित : पोतं नेऊन बुडवा ते नदीत ! ( देवरस हताशपणे पाहतात.)

कर्नल : अहो जा ना देवरस, मघापासून म्हणतायत ते, ‘ ते ’ पोतं नेऊन नदीत बुडवा- बुडवा ’ म्हणून ! बुडवायचं नेऊन, आहे काय त्याच्यात ? तुमचं काही महत्त्वाचं सामान आहे का त्याच्यात ?

देवरस : माझं असतं तर प्रश्न नव्हता. माझ्या घरात तुमच्या सामानाचं महत्त्व वाढत चाललंय सगळं !

पुरोहित : हं ! आता मी एकेक विचारत जातो. पहिलं -- त्या पोत्यात काय आहे ?

उमाबाई : अहो, या रमाबाई छत्र्यांचा कारखाना काढणार आहेत ना -- त्याचं कापड आणलंय नमूना म्हणून.

पुरोहित : ठीकाय,असू दे. दुसरा प्रश्न -- पण थांबा, बघू या बरं कायाय त्याच्यात --

देवरस : मं...मी काय सांगत होतो -- ते पोतंच महत्त्वाचंय --

पुरोहित पोतं नेऊन --

कर्नल : बुडवा ते नदीत ! आयला, योग्य साथीदार नाहीत, त्यामुळं सगळ्या संधी फुकट जातायत. पुरोहित, हे काम जर तुम्ही मला सांगितलंत ना, तर ताबडतोब करून दाखवीन मी तुम्हाला ! फक्त बाहेर कुणी तुमच्या माणसानं मला अडवता कामा नये. फक्त एक चिठ्ठी द्या तुम्ही --‘ सदर पोते नदीत बुडवू द्यावे ’-- अशी.

पुरोहित : या पोत्यातच मला घुटमळत ठेवायचे फालतू डावपेच करू नका माझ्याशी --

देवरस : बोंबला ! आता आख्खी दुनिया धुंडाळली तरी तुम्हाला काही सापडायचं नाही.

पुरोहित : याचा अर्थ आता नक्की सापडेल.

देवरस : बरं , मी झोपू का आता ?

पुरोहित : नो !

देवरस : अहो, पण, निरर्थक प्रश्नांनी-उत्तरांनी कंटाळा नाही का येणार ?

कर्नल : ( देवरसांना-- ) आता यातलं तुम्हाला जास्त कळतंय का यांना ? तुम्ही अगदी लाख सांगितलंत ‘ पोत्यात बघा, पोत्यात बघा ’ तरी हे कसे फसतील ?

देवरस : ( पोत्याकडे जात -- ) मीच दाखवतो उघडून --

पुरोहित : थांबा ! इकडे या. उगीच माझा वेळ खाऊ नका ! आपल्याला लौकरात लौकर प्रेत शोधून काढायचंय !!

रमाबाई : ( कर्नलना -- ) अहो, प्रेताचा भास होता ना तो कर्नल ?

कर्नल : ते भासातलंच प्रेत शोधून काढायचं म्हणतायत हे .

रमाबाई : मग भासातलंच प्रेत सापडेल ! खरोखरचं कसं सापडेल ते ?

कर्नल : अहो रमाबाई, पण भास चालू असताना खरोखरचंच नाही का वाटत ते ?

पुरोहित : तुम्ही सगळे माझ्या कामात अडथळे आणताय. विशेषत: देवरस तुम्ही ! या पोत्याचा विषय काढलात पुन्हा तर शूट करून टाकीन !

कर्नल : करेक्ट ! मला पण असाच त्रास देतात ते कधीकधी .

पुरोहित : मी नसताना इथं कोण, कोणकोण येऊन गेलं ?

रमाबाई : म्हणजे भासातलं पण सांगायचं ?

पुरोहित : कर्नल, या बाई कोण आहेत ? -- नको ! उत्तर नकोय. कुणाचंही उत्तर नकोय. तुम्ही सांगा कर्नल, कोणकोण आलं होतं ?

कर्नल : कुणीच नाही.

पुरोहित : ( सचिंतपणे उठून, विचारात बुडून, काही क्षणांनंतर रमाबाईंना -- ) बरं, मिसेस देवरस, भासात तरी कोणकोण आलं होतं तुमच्या ?

रमाबाई : एक म्हणजे तुम्ही स्वत: -- दुसऱ्या कपड्यांत, आणि एक बोहारी .. तो खूप कपडे मागत होता !

पुरोहित : मी नसेन.

रमाबाई : बोहारी दुसरा होता. त्याचा आवाज कर्नलांसारखा वाटत होता.

कर्नल : ते जाऊ द्या, पण ते हे कसे असतील ? जर हे असते, तर आत्ता दिसले असते का आपल्याला ?

पुरोहित : मला पुन्हा वैफल्य यायला लागलंय हळूहळू !

कर्नल : तुमचं स्वत:चं सगळं येणं जाणं हळूहळू असतं -- पण त्या आर्डी हवालदाराला मात्र भरभर बाहेर का पाठवलंत ?

पुरोहित : आता प्रश्न विचारण्याची माझी शक्ती संपुष्टात येतीय !

देवरस : ( ओरडून -- ) पोत्यात बघा त्या !

पुरोहित : ( उठून, त्याहून मोठ्या आवाजात -- ) स्-टॉ-प-इ-ट !

उमाबाई : ( कर्नलना बाजूला घेऊन -- ) अहो, तो पोतंवाला आलेला सांगायचं राहिलंय ।

कर्नल : ( पुरोहिताकडे येत -- ) ते जाऊ दे, ते काही विशेष महत्त्वाचं नाही.

पुरोहित : काय म्हणतायत त्या?

कर्नल : काही नाही. ते पोत्याचंच चाललंय ! ही नेहमी देवरसांना सामील असते.

पुरोहित : बरं ! आपण आता असं करून बघू --

कर्नल : कसं ?

पुरोहित आता तुम्ही जरा वेळ मला प्रश्न विचारा.

कर्नल : नाय नाय --- इतके निर्दय नाही होणार आम्ही -- तुम्हीसुध्दा खचून जाऊ नका -- प्रयत्न चालू ठेवा -- फक्त या देवरसांचं काही ऐकू नका म्हणजे झालं !

देवरस मला चिडायला लावू नका कर्नल -- मी स्पष्ट सांगून टाकीन --

कर्नल : पुरोहित, काय सांगून टाकीन म्हणतायत हे -- विचारा हो त्यांना -- मला तर काहीच माहिती नाही --

पुरोहित : मी त्या मॅड माणसाच्या नादी लागू इच्छित नाही !

देवरस : ( पुरोहितला -- ) तुम्ही मॅड आहात -- तुम्ही ! साधी समोरची गोष्ट दिसत नाही तुम्हाला ।

पुरोहित : ( देवरसना -- ) चूप !

उमाबाई : देवरसांना बिचाऱ्यांना उगीचच त्रास होतोय सगळा.

रमाबाई : तसं मुळीच नाहीय -- आपल्याला फार माहिती असल्यासारखं दाखवायची सवयच आहे त्यांची -- न् त्याचा त्रास होतो मग त्यांना. ( देवरस तोंडातल्या तोंडात पुटपुटत काहीतरी वाचत बसतात.)

पुरोहित : (कर्नलना --) निदान तुम्ही तरी मला सहकार्य द्या. खून शोधून काढलाच पाहिजे आपण.

कर्नल : मग बघून टाकू या का एकदा त्या पोत्यात ?

पुरोहित : पोतं सोडून बोला ! ( कर्नल पोत्याकडे जाऊ लागतात -- ) का हो ! कुठं निघालात ?

कर्नल : पोतं सोडायला।

पुरोहित : नाही, तसं नाही. सोडून म्हणजे वगळून, म्हणालो मी !

रमाबाई : खून होऊन गेलेलाय असं हे जे काय म्हणतायत ते मला तरी काही समजत नाहीय.

उमाबाई : कशावरून म्हणताय ते .. खून झालाय म्हणून ?

पुरोहित : एक फीलिंग -- एक जाणीव असते ती.

उमाबाई : भाससुध्दा असू शकेल तो -- हो की नाही रमाबाई ?

कर्नल : पुरोहित, माझी तुम्हाला एक विनंती आहे -- खून, प्रेत -- असलं बोललं की, या रमाबाईंना त्रास होतो फार -- तेवढं सोडून बोलू या आपण.

पुरोहित : मग संपलंच ! मी काय गप्पाटप्पा करायला आलोय काय इथं ?

देवरस : नाहीतर कशाला आलाय मग ? प्रेत शोधून काढायचं काही लक्षण नाही तुमचं !

पुरोहित : आहे का पण, प्रेत मुळात ! असलं तर, कुठाय ते सांगून टाका.

कर्नल : त्यांना नका विचारू पुरोहित ! ते पुन्हा प्रेत पोत्यात आहे म्हणून सांगणार !

पुरोहित : आयला, कोंडी होऊन गेलीय माझी !

उमाबाई: तुमचा हा ड्रेसच नुसता दोन हजार रुपयांचा असेल -- नाही का हो ?

कर्नल : ते तुमच्या आय-कार्डवर तुम्ही देवरसांचे ठसे घेतले होते, ते ठेवलेत ना जपून ?

देवरस : हरवले असले तर पुन्हा देतो. कर नाही त्याला डर कशाची ?

पुरोहित : इथं काही घडलं असलं तरी, खास असं काही सापडणारच नाही असं वाटायला लागलंय आता मला.

रमाबाई : आणि आम्हाला असं वाटतंय की, खास असं काही घडलेलंच नाही.

पुरोहित : दुसरं साधंच काहीतरी बोलू आता आपण.

रमाबाई : नंदी टेकडीचं बोलू या ?

पुरोहित : का जाऊच मी आता ?

कर्नल : नंदी टेकडीवर ? ( पुरोहित त्रासून पाहातो -- ) -- त्यापेक्षा आपण अशोक तलावाकडे जाऊ -- हे ( पोत्याकडे बोट दाखवून -- ) घेऊन -- अं !

पुरोहित : विसरून जावं झालं सगळं ! कशातनंच काहीच निघत नाहीय.

कर्नल : फक्त देवरसांना वाटतंय पोत्यातनं प्रेत निघेल म्हणून.

पुरोहित : ते पोतं नष्ट करायचा काही मार्ग नाही का ?

कर्नल : नदीत नेऊन बुडवा ते !

पुरोहित : कोण मी ?

कर्नल : काय हरकत आहे ? उलट तुम्हालाच शक्य आहे ते. आमची शंका येणार तुमच्या माणसांना.

पुरोहित : ते पोतं नष्ट करणं तरी इतकं महत्त्वाचं आहे का ?

कर्नल : तेच म्हणतो मी ! असेना, पडेना का बापडं ते पोतं इथं !

देवरस : आमच्या घरात नकोय ते पोतं !

रमाबाई : कर्नल, तुम्ही घेऊन जा नं ते घरी ! नको म्हणतायत ना ते इथं ? जा घेऊन तुम्ही.

कर्नल : रमाबाई, माझ्यासारख्याच भोळ्या आहात तुम्ही ! पण मी तुमच्याइतका भोळा नाही !

पुरोहित : मला फक्त त्या पोत्याशी घुटमळत ठेवण्यात यशस्वी झालात तुम्ही !

कर्नल : पण बाकी सगळ्या बाबतीत अयशस्वी .

पुरोहित आता तुमच्या यशावर कमान चढवतो मी --

कर्नल : ती कशी काय ? ती कशी काय ?

पुरोहित : ते पोतं उघडून पाहण्याशिवाय गत्यंतर दिसत नाही मला.

कर्नल : जाऊ द्या हो, एवढं काय मनाला लावून घेता !

पुरोहित : मनाला काहीच लागणार नाही आता माझ्या -- या पोत्यातनं एखादं प्रेत निघालं, तरी आता काहीच वाटणार नाही मला त्याचं.

कर्नल : काय पण स्पीडी सुधारणा होऊ शकते एखाद्या माणसात !

पुरोहित: चला कर्नल, सोडा ते पोतं !

कर्नल : सोडायचं, म्हणजे, उघडायचं का वगळायचं ?

पुरोहित : उघडायचं ! उघडायचंच आता !

कर्नल : देवरसांची परवानगी आहे का पण ? नाहीतर हे काम आपलं त्यांचं त्यांनाच सांगा तुम्ही.

देवरस : ठीक आहे. मी उघडतो. मला तरी आता कुठं काय वाटतंय त्याचं !

रमाबाई : राहू द्या, तुम्ही दोघंही नको ! मीच उघडते !

देवरस : ती काय छत्रीय ? मीच उघडते म्हणे !

उमाबाई : दुसरं कुणीही चालेल, पण तुम्ही नको रमाबाई.

पुरोहित : थांबा तुम्ही सगळेच. मीच करतो हे काम. माझंच काम आहे हे. ( सगळ्यांना हातांच्या खुणांनी बाजूला करतो -- जणू काही तो आता फार खोल उडी मारणार आहे. सगळे स्थिर झाल्यावर गंभीरपणे एकेक पाऊल टाकत पोत्यापर्यंत जातो. पाहतो. पोतं उघडण्यासाठी त्याला दोन्ही हात लावतो. पण थांबतो. मान वर उचलतो. प्रेक्षकांकडे पाहतो... प्रेक्षकांना-- ) .. अजूनही तुम्हाला वाटतंय की काही उलगडा होईल म्हणून ? हे पोतं खरंच उघडलं जाईल असं वाटतंय तुम्हाला ? एकाच ठिकाणी घुटमळत, भिरभिरत, तडफडत राहिलेलं मन अनुभवलेलं नाही तुम्ही ? पोतंवाला, हवालदार आणि मी -- तिघेही यांच्या मनांचे भाग आहोत. गुन्ह्याला मदत करणं आणि तो शोधून न काढणं हेच आमचं काम. कंटाळा येतो, उबग येते, सगळं संपलंय असं वाटत असतं, पण तरीही आयुष्य चालू आहे, असं वाटण्याची गरज असतेच आपल्याला. तुम्ही फसवले गेलात असं समजू नका. उलट आम्ही तुम्हाला अगदी पोत्याजवळ आणलं आहे. ते उघडून, संपूर्ण रिकामं करून पाह्यचं की नाही, हा तुमचा प्रश्न आहे...तुमच्या मनाचं पोतं ! नाही तर हे असंच चालणार आहे ...( पुन्हा नाटकात जातो...मूक संभाषण...पडदा पडत जातो ...)

**<u>किंवा शेवट असा घ्यावा --</u>** ( … पोत्यापर्यंत जातो. पाहत. पोते उघडतो. मग त्यातून एकेक वस्तू बाहेर काढतो – लिबर्टी पुतळ्याची प्रतिकृती, एक जाडा ग्रंथ, निवडणुकीचा फ्लेक्स आणि छत्रीचे काळे कापड. ) आले ना लक्षात ? हे होते पूर्ण न झालेल्या स्वप्नांचे नाटक ! काय करू शकतो आपण

अशा स्वप्नांबद्दल ? हसून सोडून देणे ! तेच तर केलेय या नाटकाने ! त्या स्वप्नांबरोबरच हे नाटकही आहे – हसून सोडून द्यायचे नाटक ! ( पडदा पडत जातो … )

**अंक तिसरा समाप्त**

**सूचना :- सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

चं. प्र. देशपांडे,

दूरध्वनी -- ९३७१००५७७३.